रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक ११६ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## आरोपी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर

**ठाणे :** बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेने पोलिसांवर गोळीबार केला केला आहे. त्याला ठाणे क्राइम ब्रँचच्या टीमकडून घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी घेऊन जात असताना ही घटना घडली. यावेळी अक्षयने एका पोलिसाची बंदूक हिसकावून पोलिसांच्या गाडीवर गोळीबार केला. यावेळी प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात आरोपी अक्षय शिंदे ठार झाल्याची माहिती आहे. या घटनेत एका पोलीस कर्मचाऱ्यालादेखील गोळी लागली असल्याने तो जखमी झाला असून, रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २४ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹












**आजचा अग्रलेख**
तिरुपतीच्या नावानं...

## वे|ध|क

### आज सुनावणी?

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या आमदार अपात्रता प्रकरणावर उद्या मंगळवारी (दि. २४) सुनावणी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र, हे प्रकरण ३१३ प्रकरणावर असल्याने सुनावणी होण्याची शक्यताच असल्याचं म्हटलं जात आहे. त्या दिवशी आयकर विभागाशी संबंधित एका मोठ्या प्रकरणावर सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील सत्ता संघर्षाच्या प्रकरणावर पुढची तारीख पडली जाण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. दरम्यान, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे येत्या ८ नोव्हेंबर रोजी निवृत्त होत आहेत. त्यामुळे निवृत्तीपूर्वीच ते निकाल देणार का? याचं सर्वांनाच कुतुहल लागलं आहे.

### सरपंचांच्या मानधनात वाढ

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. २३) राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सरपंच, उपसरपंचांचे वेतन वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबतची माहिती दिली आहे. राज्यातील सरपंच आणि उपसरपंचांच्या वेतनात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. तसंच ग्रामसेवकपदाचं नाव बदलून ग्रामविकास अधिकारी असं करण्यात आलं असल्याचंही मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं आहे.

# हुतात्म्यांचा अवमान

- ठेकेदाराने बांधकाम साहित्य ठेवून केले गोडाऊन
- शासकीय अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील ग्रामपंचायत पिरकोन हद्दीतमधील पाणदिवे येथील हुतात्मा परशुराम रामा पाटील स्मारकाचे गोडाऊन करण्यात करण्यात आले आहे. येथील एका ठेकेदाराने मागील दोन वर्षांपासून बांधकामाचे साहित्य ठेवून हुतात्म्यांचा अवमान केल्याचा आरोप काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नितेश पाटील यांनी केला आहे. हुतात्मा स्मारकाच्या दुरवस्थेला जबाबदार असणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरोधात नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. परंतु, या गंभीर बाबीकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही पाटील यांनी केला असून, कारवाई न केल्यास हुतात्मादिनी (दि. २५) बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

याबाबत हकीकत अशी की, अशोक



शेडगे या ठेकेदाराने हुतात्मा परशुराम रामा पाटील स्मारक पाणदिवे येथे जलजीवन मिशन या योजनेच्या कामाचे बांधकाम साहित्य गेल्या दोन वर्षांपासून •› पान २ वर

**शासनास विसर**

देशातील स्वातंत्र्य संग्रामातील २५ सप्टेंबर १९३० साली ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन चिरनेर आक्कादेवीच्या जंगलात इतिहास घडवला. तो दिवस इतिहासातील सुवर्ण पान ओळखला जातो. सविनय कायदेभंगाच्या या चळवळीत अनेकांनी हौतात्म्य पत्करले. त्यामध्ये हुतात्मा परशुराम रामा पाटील यांचाही समावेश होता. त्यांचे स्मारक पिरकोन हद्दीतील पाणदिवे येथे उभारण्यात आले आहे. परंतु, त्यानंतर शासनास या स्मारकाचा विसर पडल्याचे येथील परिस्थितीवरुन दिसून येते. या स्मारकाची अद्याप डागडुजी करण्यात आलेली नाही. रंगरंगोटी, स्वच्छतेअभावी परिसरात दुर्गंधी पसरली आहे. मात्र, याकडे शासन आणि संबंधित प्रशासनान लक्ष द्यायला वेळ मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे.



“सध्या मी कामानिमित्त बाहेर आहे. संबंधित विषयासंदर्भात मी माहिती घेतो. आमच्या कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देतो. चुकीचे काही असेल तर त्यावर कारवाई करण्यात येईल.
- उद्धव कदम, तहसीलदार

# आमदार महेंद्र दळवी समर्थकांमध्ये राडा

**दोघेही रुग्णालयात उपचारासाठी दाखल**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांच्या समर्थकांमध्ये सोमवारी (दि. २३) सायंकाळी जोरदार हाणामारी झाली. शासनाने माती उत्खननप्रकरणी आकारलेला दंड देण्यावरून दोघांमध्ये भांडण झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यामध्ये दोघेही जखमी झाले असून, अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल केले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हे दोघेही वायशेत येथील असून, व्यावसायिक आहेत. खडी, माती उत्खनन करून ती विक्रीला पाठविण्याचे काम ते करीत आहेत. मात्र, अनधिकृत व्यवसाय चालविल्यामुळे त्यांच्यातील एकाविरोधात महसूल विभागाने दंडात्मक कारवाई केली होती. दंड भरण्यावरून दोघांमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून वाद सुरु होता. हा वाद



अखेर विकोपाला गेला. सोमवारी सायंकाळी दोघांमध्ये शाब्दीक चकमक उडाली. त्याचे पर्यवसान मोठ्या राड्यात झाले. अखेर रागाच्या भरात एकमेकांना मारहाण करण्यात आली. या मारहाणीत एकाच्या डोक्याला गंभीर दुखापत, तर दुसऱ्याच्या हाताला दुखापत झाली. त्यांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. दोघांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेचा पंचनामा करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते. एकमेकांविरोधात गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

# ‘शिधा’ न मिळाल्याने ‘आनंद’ हरवला




**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील तीन लाख ९८ हजार लाभार्थ्यांना शंभर रुपयांत हा आनंदाचाशिधामिळणारहोता. परंतु, गणेशोत्सव संपूनही ग्राहकांपर्यंत शिधा पोहोचलाच नाही. शासनाने नेमलेल्या ठेकेदाराकडून फक्त ३५ टक्केच साहित्याची वाहतूक झाली आहे. ठेकेदाराच्या नियोजनाच्या अभावाचा फटका ग्राहकांना बसला असून, त्यांना आनंदाच्या शिधाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

> “रायगड जिल्ह्यामध्ये तीन लाख ९८ हजार लाभार्थी आहेत. उरण व अलिबाग तालुक्याचे शंभर टक्के जिन्नस उपलब्ध झाले आहेत. वाटपही सुरु केले आहे. अन्य तालुक्यात जिन्नस शंभर टक्के उपलब्ध झाले नसल्याने वाटप थांबविले आहे. पूर्ण जिन्नस आल्यावर वाटप सुरु केले जाईल. ठेकेदारांकडे पाठपुरावा चालू आहे.”
> – सर्जेराव सोनावणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड

गोरगरीबांना सण-उत्सव आनंदात साजरा करता यावा यासाठी राज्य सरकारने मागील दोन वर्षांपासून आनंदाचा शिधा दीड दिवसांपासून सहा दिवस, दहा दिवस, त्यानंतर साखर चौथ्या गणेशमूर्तीचे विसर्जन झाले. मात्र, जिल्ह्यातील लाखो ग्राहकांपर्यंत आनंदाचा शिधाच अद्याप पोहोचला नाही. सरकारने नेमलेला ठेकेदार आनंदाचा शिधा पोहोचविण्यास उदासीन ठरल्याची ओरड सरकारी यंत्रणेकडून सुरु आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये आनंदाचा शिधाचा लाभ घेणारे तीन लाख ९८ हजार लाभार्थी आहेत. जिल्ह्यातील अलिबाग व उरण तालुका वगळता अन्य तेरा तालुक्यांत फक्त ३५ टक्के साहित्य पोहोचले आहे. चारही जिन्नस उपलब्ध न झाल्याने वितरण करण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे शंभर टक्के शिधा कधी पोहोचणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### ऑनलाईनचे प्रमाण कमी असल्याने लाभार्थ्यांमध्ये घट

गेल्या दोन वर्षांपासून सरकारने सण-उत्सवामध्ये गरीबांना आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला. रायगड जिल्ह्यामध्ये सुमारे चार लाख ३६ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत होता. परंतु, या आकडेवारीत सुमारे ४० हजाराने घट झाल्याची माहिती समोर येत आहे. ऑनलाईनचे प्रमाण कमी झाल्याने तसेच सर्वच लाभार्थी या योजनेचा लाभ घेत नसल्याने ही आकडेवारी कमी झाल्याची माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली. या आकडेवारीत घट होण्यामध्ये नक्की कोण जबाबदार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# मोरेंविरोधात अविश्वास ठराव दाखल



- सहाय्यक निबंधकांना संचालकांचे पत्र
- विश्वासात न घेता परस्पर व्यवहार केल्याचा आरोप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमेश मोरे यांच्याविरोधात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यांनी सोमवारी (दि. २३) सहाय्यक निबंधक अमोल निरडे यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला आहे.

सभापती रमेश मोरे यांनी वेळोवेळी सदस्यांना दिलेली अपमानास्पद वागणूक, विश्वासात न घेता परस्पर केलेले आर्थिक व्यवहार, कागदपत्रांमध्ये असणारी अनियमितता यामुळे संचालकांना संस्थेचे कामगाज करण्यास अडचण येत होती. त्याचप्रमाणे परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. त्यामुळे बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या हितासाठी चालावी म्हणून अविश्वास ठराव दाखल केला असल्याचे संचालकांनी खासगीत बोलताना सांगितले. यावेळी रायगड जिल्हा बँक संचालक अस्लम राऊत, भाजपा युवक जिल्हा अध्यक्ष निलेश थोरे, उपसरपंच दिनेश गुगळे व संचालक, सदस्य उपस्थित होते.

यासंदर्भात सहाय्यक निबंधक माणगाव अमोल निरडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, अविश्वास ठराव दाखल झाला असून, काही दिवसातच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. दरम्यान, रमेश मोरे यांच्यावर काय कारवाई होतेय, याकडे सर्व माणगावकरांचे लक्ष लागून गेले आहे.

# परतीच्या दिशेने मान्सूनचा प्रवास

**जाता जाता दणका देण्याचा अंदाज**

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पावसाळा संपला असून, आता परतीच्या दिशेने मान्सूनचा प्रवास सुरू झाला आहे. राजस्थान व कच्छ काही भागातून सोमवारी (दि. २३) मान्सूनने माघार घेतल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. मान्सूनचा परतीचा प्रवास उशिराने सुरू झाला आहे. गतवर्षी २५ सप्टेंबर रोजी मान्सून वारे राजस्थानातून माघारी फिरले होते.



मान्सून आगमन आणि परतीच्या दीर्घकालीन सर्वसामधान तारखांचे सुधारित वेळापत्रकानुसार १७ सप्टेंबर ही मान्सूनच्या राजस्थानातून परतीचा प्रवास सुरू करण्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे. मात्र, गेली काही वर्षे मान्सूनच्या परतीचा मुहूर्त लांबत आहे. यंदाही तब्बल सहा दिवसाने (दि. २३) मान्सूनने राजस्थानातून माघारीस सुरूवात केली आहे. दि. २ जुलै रोजी संपूर्ण देशात पोहोचलेल्या मान्सूनने दोन महिने •› पान २ वर

**गेल्या पाच वर्षांतील मान्सूनची परतीची वाटचाल**

| वर्ष | तारीख |
|---|---|
| २०१९ | ९ ऑक्टोबर |
| २०२० | २८ सप्टेंबर |
| २०२१ | ६ ऑक्टोबर |
| २०२२ | २० सप्टेंबर |
| २०२३ | २५ सप्टेंबर |
| २०२४ | २३ सप्टेंबर |

> “आजपासून (दि.२३) मान्सून परतीला प्रारंभ झाला आहे. राजस्थान, राजस्थानकडील पंजाबचा काही भाग, हरियाणा आणि गुजरातमध्ये मान्सून परतीला अनुकूल परिस्थिती असेल.”
> – डॉ. के.एस. होसाळीकर, हवामान विभाग प्रमुख, पुणे

# अल्पवयीन तरुणीवर अत्याचार

**दोघा तरूणांविरूद्ध पोक्सोंतर्गत गुन्हा**

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील लोहारमाळ येथील पेट्रोलपंपावर काम करणाऱ्या तरुणीसोबत ती अल्पवयीन असल्यापासून एडीट केलेले खोटे फोटो दाखवून दोघा तरुणांनी शारीरिक संबंध ठेवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याबाबत प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने अधिक तपास करीत आहेत.

या गुन्ह्यामध्ये पीडित तरुणी अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही ऑक्टोबर २०२२ ते २१ सप्टेंबर २०२४ सकाळी साडेनऊच्या सुमारास तिच्या घरामध्ये आरोपी तरूणांनी तिच्या मनाविरूध्द तिला मारहाण व दमदाटी करून एडीट केलेले खोटे फोटो दाखवून वेळोवेळी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. याबाबत शनिवारी मध्यरात्री २१ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ११ वाजून २६ मिनिटांनी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये पीडित तरूणीने (सध्याचे वय १९) दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचा •› पान २ वर









# भाजपाविरोधात धनगर समाज आक्रमक

## अनुसूचित जमातीच्या आदेशाच्या अंमलबजावणीची मागणी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**देशाचे तत्कालीन पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी २००४ मध्ये ढोल वाजवून, २०१४ मध्ये विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एसटीमध्ये, तर २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी बारामती येथील समाजाच्या मेळाव्यात आम्हाला निवडून द्या, पहिल्याच कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला आरक्षण देऊ, असा शब्द दिला होता.**



परंतु, त्याचा त्यांना विसर पडला आहे. याविरोधात धनगर समाज आक्रमक झाला असून, महाराष्ट्रातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीतील आदेशाची त्वरित अंमलबजावणी करावी, याकरिता कर्जत तालुक्यातील समाज बांधवांनी कर्जत तहसीलदार कार्यालयात निवेदन दिले.

महाराष्ट्र एकूण तीन कोटी धनगर समाज बांधव असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेत अनुक्रमांक ३६ धनगड हे अस्तित्वात नसून, धनघड हेच धनगर आहेत. म्हणूनच धनगर समाजाच्या अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, ही आमची प्रमुख मागणी असल्याचे त्यांनी तहसील कार्यालयात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

२००४ साली तत्कालीन भारताचे पंतप्रधान कै. अटलबिहारी वाजपेयी यांनी धनगर समाजाच्या मेळावा घेऊन ढोल वाजवून आरक्षण देतो म्हणाले, ते मिळाले नाही, तर २०१४ साली देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोलापूर येथे धनगर समाजाला एसटी आरक्षण देऊ म्हणाले, त्यांनीही आपला शब्द पाळला नाही. २०१४ देवेंद्र फडणवीस यांनी बारामती येथे धनगर समाजाच्या मेळाव्यात आम्हाला निवडून द्या, पहिल्याच कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला आरक्षण देऊ, असा शब्द दिला होता. त्यावेळेस संपूर्ण समाजाने भाजपला मतदान करून सत्तेत आणले, पण त्यांनाही त्याचा विसर पडला, असही निवेदनात नमूद केले आहे.

यावेळी धनगर समाज बांधवांनी 'आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे' अशा घोषणा देऊन परिसर दणाणून टाकला. यावेळी धनगर समाचे अध्यक्ष ॲड. संतोष आखाडे, उपाध्यक्ष बाळासाहेब आखाडे, खजिनदार नारायण बाडेकर, माथेरानचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे, नेरळ ग्रामपंचायतीचे माजी सदस्य संतोष आखाडे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनगर समाजाचे रास्ता रोको आंदोलन




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

धनगर समाजाला (एसटी सर्टिफिकेट) धनगर आरक्षण मिळावे यासाठी सोमवारी सकल धनगर समाज खालापूर आणि हर हर चांगभले धनगर चांगभले धनगर समाज खालापूर यांच्या वतीने पालीफाटा येथे रास्ता रोको आंदोलन करुन तहसीलदारांना निवेदन दिले.

गेल्या अनेक वर्षांपासून धनगर आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी गेल्या ६० वर्षांपासून आंदोलन करत आहोत, मात्र सरकारने याकडे लक्ष दिले नसल्याने समाज बांधवांच्या वतीने गेल्या अनेक दिवसांपासून पंढरपूर येथे आमरण उपोषण सुरू आहे. याकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे. सरकारला धनगर समाजाची ताकद दाखवायची वेळ आली असून, या सकल धनगर समाज खालापूर आणि हर हर चांगभले धनगर समाज खालापूर यांच्या वतीने पाली फाटा येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी मठाधीपती महंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी आश्रम, उपसभापती अण्णासाहेब बाचकर महाराज, ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे कोकण संपर्क प्रमुख रामचंद्र पुकळे, खालापूर तालुका धनगर समाज अध्यक्ष हरेश ढेबे, ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष घाटे, रासपा कोकण प्रदेश अध्यक्ष भगवान ढेबे, रासपा रायगड जिल्हाध्यक्ष संपत ढेबे, ऑल इंडिया धनगर समाज रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील कोकळे, क्षत्रिय धनगर समाज कर्जत तालुका अध्यक्ष अक्षय चोपडे, ऋषिकेश वाघमोडे, जानू आखाडे, शिरवली उपसरपंच विजय ढेबे आदी उपस्थित होते.

# आपत्तीच्या निविदा प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची चौकशीची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आपत्ती व्यवस्थापनचा घोटाळा उघडकीस आला आहे. विशिष्ट कंपनीच्या फायद्यासाठी आपदा मित्र किट पुरवठा आणि प्रशिक्षण सेवा या दोन्ही भिन्न सेवांसाठी एकत्रित निविदा प्रक्रिया राबवून पुरवठादारांवर अन्याय केल्याचा आरोप विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला असून, या प्रक्रियेला स्थगिती देऊन उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील तसेच प्रधान सचिव यांच्याकडे केली आहे. त्यामुळे रायगडचा आपत्ती व्यवस्थापन विभाग अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

याबाबत दिलेल्या पत्रात वडेट्टीवार यांनी म्हटले आहे की, मदतकार्य व पुनर्वसन विभागाच्या आपत्ती व्यवस्थापन युनिटने बचाव किटचा पुरवठा व प्रशिक्षण सेवा देण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली. यापूर्वीदेखील याच विभागाने प्रशिक्षण व उपकरणासाठी वेगवेगळी निविदा काढली होती. आता मात्र आपला मित्र कीट पुरवठा आणि प्रशिक्षणसेवा या दोन्ही भिन्न सेवांसाठी एकत्रित निविदा राबवली आहे. सुमारे २० कोटी रुपयांच्या या निविदासाठी बैठकही घेण्यात आली नाही. निविदेतील अटी व शर्ती दोषपूर्ण आहेत, असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला असून, याबाबत पत्र संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांना दिले असल्याची माहिती समोर येत आहे. रायगड जिल्ह्यामध्ये आपदा मित्र ३०० हून अधिक असल्याची माहिती समोर येत आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा घोटाळा विरोधी पक्ष नेत्यांनी उघड केल्याने आपत्ती विभाग मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता असून, वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांचीदेखील चौकशी होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

# भीमाबाई म्हात्रे यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील खोपटे येथील भिमाबाई बाबुराव म्हात्रे (८०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले आहे.




त्यांच्या पार्थिवावर खोपटे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन विवाहित पुत्र, दोन विवाहित कन्या, सुना, जावई, आठ नातवंडे, तीन पतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार, दि. २४ सप्टेंबर रोजी खोपटे येथील श्रीक्षेत्र नाना नानी पार्क येथे होणार आहे. तर उत्तरकार्य विधी गुरुवार, दि. २६ सप्टेंबर रोजी खोपटे येथील राहत्या घरी दुपारी बारा वाजता होणार असल्याची माहिती पुत्र तथा उपशिक्षक राजेंद्र म्हात्रे यांनी दिली.

**पान १ वरून**

# हुतात्म्यांचा अवमान

ठेवले आहे. सदरचे बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी त्यांनी ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी घेतलेली नाही, असे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे. हुतात्मा स्मारक ही पाणदिवे गावाचे मंदिर, प्रेरणास्थान आहे. तरी याठिकाणी बांधकामाचे साहित्य ठेवून गोडाऊनमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. त्यामुळे पाणदिवे गावाचे नाव खराब करण्याचा प्रयत्न सदर ठेकेदार करीत आहे. या व्यक्तीला वारंवार सूचना देऊनही साहित्य उचलण्यात आलेले नाही. हुतात्मा स्मारकात बांधकाम साहित्य ठेवल्याने हुतात्मा स्मारकाची पडझड झाली आहे. हुतात्मा स्मारकचे विदरूपीकरण झाले आहे, यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराविरोधात हुतात्मा स्मारकाचा अपमान केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करावा. याबाबत कारवाई न केल्यास हुतात्मा स्मारक पाणदिवे येथे २५ सप्टेंबर रोजी म्हणजेच हुतात्मा दिनी आमरण उपोषण करण्याचा इशारा पिरकोन ग्रामपंचायतचे सदस्य तथा काँग्रेसचे तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष नितेश पाटील यांनी प्रशासनाला दिला आहे. या संदर्भात नितेश पाटील यांनी उरणचे तहसीलदार उद्धव कदम, पिरकोन ग्रामपंचायत सरपंच कलावती पाटील व उरण पोलीस ठाण्याशी पत्रव्यवहारदेखील केला आहे.

**संबंधित ठेकेदाराविरोधात हुतात्मा स्मारकाचा अपमान केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करावा. याबाबत कारवाई न केल्यास हुतात्मा स्मारक पाणदिवे येथे २५ सप्टेंबर रोजी म्हणजेच हुतात्मा दिनी आमरण उपोषण करणार.**

**- नितेश पाटील, काँग्रेस तालुकाध्यक्ष**

# परतीच्या दिशेने मान्सूनचा प्रवास

आणि २१ दिवस राजस्थानमध्ये मुक्काम केला.

यंदाच्या हंगामात १९ मे रोजी अंदमान निकोबार बेटांवर दाखल झालेला मान्सून ३० मे रोजी केरळमध्ये पोहोचला. अरबी समुद्रातून प्रगती करत ६ जून रोजी मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला. त्यानंतर २३ जून रोजी मान्सूनने महाराष्ट्र व्यापला. मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असल्याने उद्या (दि. २४) पश्चिम राजस्थान आणि लगतच्या पंजाग, हरियणणा, गुजरात राज्याच्या काही भागातून मान्सून माघारी फिरण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. या परतीच्या प्रवासात मध्य भारत व मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यंदा हवामान विभागानूसार देशामध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. सुमारे १०६ टक्के पाऊस होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. त्यानुसार देशातील अनेक भागामध्ये सरासरी पावसाची नोंद झाली.

# अल्पवयीन तरूणीवर अत्याचार

अतिरिक्त कार्यभार पाहणारे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार जागडे यांनी दखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांनी गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पोलादपूर पोलीसांना मार्गदर्शन केले.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक

पनवेल महानगरपालिकेत तक्रार निवारण करीता संकेतस्थळ तयार करणेबाबत सदरकामी अंदाजपत्रक बनविणे करिता बाजारभाव मागविण्यात येत आहेत. तरी निविदाधारक यांनी नमूद कामाचे दर हे अंदाजपत्रक बनविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागात विहित मुदतीत जमा करण्यात यावे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील माहिती व तंत्रज्ञान विभागात उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

मुदत :
पमपा/मातंवि/३०२४/प्र.क्र.१६/४००/२०२४
दिनांक: २३/०९/२०२४

सही/-
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक दत्तू लक्ष्मण तापकिर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५५ | १/अ/५ | ०-२०-०० | ०-८० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :-२४/०९/२०२४

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
**उप प्रादेशिक कार्यालय रायगड-१**

**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

**मे. सिलिकॉन इंटरनॅशनल प्रॉडक्टस,** सर्व्हे क्रं. ३४/१/२/३/४ ब २, ३५/१-२, ३५/२ येथे स्थित ३४/५/अ २ व ब २, ३६/२-ब २, खोपोली-पेण रोड, पाली फाटा, गाव-दहिवली, ता. खालापूर, जि. रायगड- ४१०२०३ यांच्या सिलिकॉन फ्लुइड उत्पादन जनसुनावणी प्रकल्प विस्तार १५० मेटन/म ते ७५० मेटन/म बाबत प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**ठिकाण : रिशिवन रिसॉर्ट, झा ॲन्ड असोसिएटस, सर्व्हे नं. ८/१, खोपोली पेण रोड आदोशी, शिलफाटा-खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड- ४१०२०३.**
**दिनांक : २५/१०/२०२४ वार : शुक्रवार**
**वेळ : दु. ०३:०० वाजता**

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

**प्रादेशिक कार्यालय / उप-प्रादेशिक कार्यालय रायगड-१,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,**
**६ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४.**
**ई-मेल : E-mail: sroraigad1@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४. प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, खालापूर, जि.रायगड.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. खालापूर, जि.रायगड
६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. खालापूर, जि. रायगड
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड न.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई-२२.
९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
११. ग्रामपंचायत कार्यालये : मौजे- देवन्हावे, मौजे - दहिवली, मौजे -सावरोली, मौजे - सारसन, मौजे -वडवळ.

**सही/-**
**(प्रशांत भोसले),**
**उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सिध्देश विवेकानंद घरत रा. राम मंदीर जवळ, घर नं. १०१७, चिरले, जासई, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत त्याने मालक श्री. भीमा बावु गायकवाड यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नांदगाव, तालुका कर्जत, जिल्हा - रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| गावाचे नाव | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|---|
| नांदगाव | ८४ | १ | ००-६०-०० पैकी ००-५६-०० | ०-४७ |
| नांदगाव | ८६ | - | ००-५४-४० | ४-५६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दाण हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त, वैगेरे हक्क असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २४/०९/२०२४

**(रोहिदास जनार्दन मिणमिणे )**
**अधिवक्ता**
रा.भडवळ, पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९२०९५८१९१०/९६८९९९२४१९

## सार्वजनिक सूचना

कृपया लक्षात घ्या की, श्री राजेंद्र प्रताप गावडे (यापुढे ' अन्य पक्ष' म्हणून संबोधले जाईल) यांची कुरकुंडी-कोलतेंबी, पोस्ट पोयनाड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व्हे क्र. १५७ मधील १० आर, सर्व्हे क्र. १५८ मधील १५ आर आणि सर्व्हे क्र. १५९ मधील १९ आर बिगर कृषी आणि कृषी मालमत्ता (यापुढे 'स्थावर मालमत्ता' म्हणून संबोधले जाईल) खरेदी करण्याचा माझ्या अशिलाचा हेतू आहे.

माझ्या अशिलाला कळविण्यात आले आहे की, दि. २८/०२/१९९१ रोजी केलेल्या करारानुसार श्रीमती स्नेहप्रभा गोविंद पाटील यांनी श्रीमती प्रिया प्रताप गावडे (श्री राजेंद्र प्रताप गावडे यांची सावत्र आई) यांना त्यांच्या जमिनीमधून (सर्व्हे क्र. १५६/२) स्थावर मालमत्तेत (सर्व्हे क्र. १५७, १५८ आणि १५९) ३०० फूट लांब आणि १२ फूट रुंद असलेला पथ/रस्ता याद्वारे प्रवेश दिला आहे.

माझ्या अशिलाला कळविण्यात आले आहे की, दि. २८/०२/१९९१ नंतर श्रीमती प्रिया प्रताप गावडे आणि/किंवा त्यांचे कुटुंबीय, मित्र, नोकर इत्यादींना ०१/०७/१९९१ रोजी त्यांचे निधन होईपर्यंत आणि त्यानंतर आजपर्यंत सर्व्हे क्र. १५८ प्रमाणे असलेल्या त्यांच्या मालमत्तेत विना अडथळा प्रवेश आणि संपर्क आहे. तसेच, श्रीमती प्रिया प्रताप गावडे यांनी दोन खांब बांधून पोयनाड-अलिबाग रस्त्यावर प्रवेशद्वार उभारून स्थावर मालमत्तेकडे जाण्यासाठी रस्ता तयार केला आहे.

असे समजते की, श्रीमती प्रिया प्रताप गावडे यांचे ०१/०७/१९९१ रोजी निधन झाले आणि १९९१ च्या टी. व आय. जे. याचिका क्र.११४ नुसार श्रीमती प्रिया प्रताप गावडे यांच्या मालमत्तेबाबत अन्य पक्षाच्या बाजूने प्रशासनाची पत्रे प्राप्त झाली ज्यामध्ये सर्व्हे क्र. १५८ मधील १५ आर जमिनीचा समावेश आहे.

श्रीमती स्नेहप्रभा पाटील यांचे पती श्री. गोविंद म. पाटील (दिनांक २३/१०/९७ रोजी मरण पावलेले) यांनी दिनांक १५/०५/९८ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रतिज्ञापत्र सादर करून सर्व्हे क्र. १५७, १५८ आणि १५९ मधील जमिनीच्या वापरकर्त्याचे रूपांतरण करण्याच्या उद्देशाने सर्व्हे क्र. १५६ मधील जमिनीतून प्रवेश आणि रस्ता करण्यास हरकत नसल्याचे जाहीर केले.

अन्य पक्ष, त्यांचे कुटुंब, मित्र, कंत्राटदार, मध्यस्थ इत्यादींना त्यांच्या मालमत्तेत विनाअडथळा प्रवेश आहे आणि ते १९९१ पासून आजतागायत सर्व्हे क्र. १५६ मधील मालमत्तेतून हा रस्ता वापरत आहेत.

माझ्या अशिलाला कळविण्यात आले आहे की, अन्य पक्ष, त्याचे कुटुंब, मित्र, कंत्राटदार, नोकर इत्यादी ३० वर्षांहून अधिक काळ सर्व्हे क्र. १५६ मधील मालमत्तेत असलेल्या रस्त्याचा वापर करत आहेत आणि त्यांच्याकडे वडखळ-अलिबाग रोड, कुरकुंडी कोलटेंबी गाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड पासून स्थावर मालमत्ता (सर्व्हे क्र. १५७, १५८ आणि १५९) येथे जाण्यासाठी श्रीमती स्नेहप्रभा गोविंद पाटील (मृत) यांच्या सर्व्हे क्र. १५६ मधील मालमत्तेतून सुलभता आणि/किंवा करार आणि/किंवा वापर आणि सवय या मार्गाने येण्या-जाण्याचा व वहिवाटीचा अधिकार आहे.

वरील बाबी लक्षात घेऊन, माझा अशील याद्वारे जनतेला जाहीर सूचना देतो आहे आणि सर्व्हे क्र. १५६ मधील मालमत्तेतून सर्व्हे क्र. १५७, १५८ आणि १५९ मधील स्थावर मालमत्तेत प्रवेशाच्या / वहिवाटेच्या अधिकाराबाबत आक्षेप असलेल्या सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला/ना आवाहन करत आहे की, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत स्थावर मालमत्तेशी संबंधित असलेले आक्षेप आणि दावे लेखी स्वरूपात कागदोपत्री ठोस पुराव्यांसह नोंदणीकृत टपालाद्वारे वकील, गणेश शिवराम देसाई यांच्याकडे सदनिका क्रमांक २०४, इमारत क्र.३६, आकर्षण सीएचएस लि, छत्रपती शिवाजी राजे कॉम्प्लेक्स, म्हाडा कॉलनी, समोर, एकता नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे आणि ईमेलद्वारे gsdesoi@hotmail.com येथे सादर करावे अन्यथा मृत स्नेहप्रभा गोविंद पाटील आणि/किंवा तिचे वारस आणि/किंवा उत्तराधिकारी यांच्या मालकीच्या सर्व्हे क्र. १५६ किंवा १५६/२ मधील स्थावर मालमत्तेतुन सर्व्हे क्र. १५७, १५८ आणि १५९ मधील स्थावर मालमत्तेत प्रवेश किंवा वहिवाटीच्या अधिकारावर आणि या सूचनेमध्ये केलेल्या दावे आणि विधानांवर किंवा त्याबाबत कोणत्याही विवादासाठी कोणत्याही व्यक्तीला आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल आणि अशा परिस्थितीत "माझा अशील" दोन्ही पक्षांनी कल्पिल्याप्रमाणे विक्रीचा व्यवहार पूर्ण करेल, याची नोंद घ्यावी.

**तारीख : २४/०९/२०२४**
**वकील गणेश शिवराम देसाई.**

## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की आम्ही **(१) सौ. मृदुला अशोक हरचंदराय** आणि **(२) कुमारी मृलालिनी अशोक हरचंदराय** यांच्या येथे खाली लिहलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या जमिनीच्या संदर्भात (यापुढे एकत्रितपणे **"सदर जमीन"** म्हणून संदर्भित) त्यांच्या शीर्षकाची चौकशी करत आहोत.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर जमिनीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागासंबंधात कोणतेही हक्क, शीर्षक, दावा, हितसंबंध आणि प्रतिपादन जसे की करार, विक्री, देवाण घेवाण, गहाण, ताबा, भेट, ट्रस्ट, देखभाल, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेतत्त्वाखाली, विकास हक्क, भाडेकरार, धारणाधिकार, भाग, परवाना, आउटगोइंग्स, वहिवाटीचा हक्क, अडथळा, करार, अट किंवा कोणत्याही न्यायालय किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपात असतील तर त्यांनी कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि/किंवा इमेलद्वारे kunal.vaidya@kangacompany.com येथे ह्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावा/ आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**
(सदर जमिनीचे वर्णन)

ते सर्व कृषी जमिनीचे तुकडे आणि हिस्से महसूल मौजे झिराडपाडा, तालुका अलिबाग, नोंदणी जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे स्थित आणि असलेले ज्याचे खालील प्रमाणे गट क्र.:

| अनु. क्र. | गट क्र. | क्षेत्रफळ (हेक्टर्स आर्स आणि चौरस मीटर्स) |
|---|---|---|
| १. | गट क्र. ५२ चा भाग (पूर्वीचा गट क्र. २५६) | १ हेक्टर ४० आर्स ४७ चौरस मीटर्स |
| २. | गट क्र. ११५ चा भाग (पूर्वीचा गट क्र. ४४८) | ७४ आर्स |
| ३. | गट क्र. ११६ चा भाग (पूर्वीचा गट क्र. ४४९) | ९ आर्स |

२४ सप्टेंबर, २०२४ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**
सही/-
कुणाल वैद्य
भागीदार
ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स

## महाराष्ट्र शासन
## महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :-mahad.ee@mahapwd.gov.in (०२१४५) २२२१६७

**निविदा सूचना क्रमांक ४१ सन २०२४-२०२५**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना दिनांक २०/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २७/०९/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक ३०/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर करावयात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ३०/०९/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माणगाव येथील सा.बां. उपविभाग, माणगांव येथील उप अभियंता निवासस्थानासमोरील बाजूस संरक्षण भिंत बांधणे... | ९७७७८४ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्राजिमा ६७ कि.मी. १२/०० ते २३/०० मध्ये सुधारणा करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (प्रा.जि.मा.६७ कि.मी. १८/०० ते २३/०० मध्ये सुरक्षात्माक उपाय योजना करणे.) | ९१८३४५ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्राजिमा ६७ कि.मी. १२/०० ते २३/०० मध्ये सुधारणा करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (प्रा.जि.मा. ६७ कि.मी. १२/०० ते १८/०० मध्ये सुरक्षात्माक उपाय योजना करणे.) | ९३८८५० | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | महाड तालुक्यातील दासगांव गोठे येथे सावित्री नदीवर मोठया पुलाच्या जोडरस्त्याचे भुसंपादन करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (भावे किये पदाजी रायाचा कोंड रस्ता प्राजिमा ९४ कि.मी. ०/०० ते १०/०० मध्ये सुरक्षात्मक उपाय योजना करणे.) | ९५३७७८ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | उपजिल्हा रूग्णालय माणगांव येथील सहाय्यक अधिसेविका रूमवरती पत्राशेड बसविणे व सार्वजनिक शौच्छालयाची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ८६२३१२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे जुई मराठवाडी ग्रा.पं.जुई ता. महाड येथे अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (डोंगरी) | ८१६२३१ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे करंजाडी ग्रा.पं.करंजाडी ता. महाड ठाकरकोंड येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी) | ४८८२८६ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ८ | मौजे विन्हेरे प्रा.पं. विन्हेरे ता. महाड सुतारकोंड येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी) | ४८४८३१ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | ग्रा. पं. देवळे मौज करंजे बौध्द्वावाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | ८०६२५६ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | महाड न्यायालय व तहसिल कार्यालय आवारातील कार्यालय येथे पावसाळ्यापूर्वीच्या उपाययोजना करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. | ३२३५१२ | ४००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ११ | महाड येथील शासकीय विश्रामगृह आवारातील कार्यालय येथे पावसाळ्याच्या उपाययोजना करणे तालुका महाड, जिल्हा रायगड. | २३४००० | ३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग नउ व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना : https://mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.
जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४४३६
दिनांक : १९/०९/२०२४

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/ २०२४-२०२५/८४**

# कचऱ्याचा प्रश्न मार्गी लागणार

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**ग्रामीण भागातील कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. दहा तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींना घंटागाडी देण्यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीची तरतूद अर्थ संकल्पात केली आहे. घंटागाडी खरेदीसाठी गटविकास अधिकारी यांना एक कोटी २७ लाख ५० हजार रुपयांच्या निधी वितरीत केला आहे. यामुळे जिल्ह्यातील घनकचऱ्याचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे.**



रायगड जिल्हा पर्यटनाबरोबरच औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. पर्यटन व औद्योगिकरण झपाट्याने वाढत आहे. वेगवेगळे प्रकल्प जिल्ह्यात होऊ घातले आहेत. जिल्ह्यामध्ये नागरिकरणदेखील वाढू लागले आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातदेखील लोकवस्ती वाढत आहे. शहरासह ग्रामीण भागातही कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे. गावांच्या रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी कचरा अस्ताव्यस्त पडलेला आहे. यामुळे गावे, वाड्यांमध्ये आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने व्हावे यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील १७ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. यामध्ये अलिबाग व पनवेल तालुक्यातील ८, महाडमधील २, खालापूर, म्हसळा, माणगाव, तळा, पेण, कर्जत व श्रीवर्धनमधील प्रत्येकी १ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत घंटागाडी खरेदी करण्यासाठी २०२३-२४ या आर्थिक वर्षात दोन कोटी रुपयांची तरतूद केली आहे. घंटागाडी खरेदी करण्यासाठी १७ ग्रामपंचायतींना ७ लाख ५० हजार रुपये प्रमाणे १ कोटी २७ लाख ५० हजार रुपयांचा निधी देण्यासाठी गटविकास अधिकारी यांना फेब्रुवारी २०२४ वितरीत केला आहे.

- **१७ ग्रामपंचायतींना घंटागाडी**
- **१ कोटी २७ लाख रुपयांचा निधी वितरीत**

### या ग्रामपंचायतींना निधी वितरीत केला

महाड- अप्पर तुडाळ, विन्हेरे,
अलिबाग- परहूर, पेढांबे, चरी, पेझारी
खालापूर- गोरठण बुद्रूक
म्हसळा- खरसई
पनवेल- कराडे खुर्द, पळस्पे, आकुर्ली, उमरोली
माणगाव- तळाशेत
तळा- वाशी हवेली
पेण- वढाव
कर्जत- वावळोली
श्रीवर्धन- खारगांव

> जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात घंटागाडी देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. घंटागाडी खरेदी करण्यासाठी गटविकास अधिकारी यांना निधी वर्ग केला आहे.
>
> – राजेंद्र भालेराव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग, रायगड

## पथविक्रेते सदस्य निवडणूकीबाबत संभ्रमात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड-जंजिरा नगरपरिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथविक्रेता समिती ८ सदस्यीय निवडणूकीचे आरक्षण व निवडणूकीचे कार्यक्रम जाहीर झाले आहेत. तरी कोण-कोण या निवडणुकीत मतदान करणार या संदर्भात पथविक्रेते संभ्रमात आहेत.

पथविक्रेता अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता नियम २०१६ मधील नियम (१४) २ अंतर्गत (८) पथविक्रेते सदस्यांचा निवडणूक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. परंतु, या संदर्भात वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. परंतु, मुरुडमध्ये नोंदणीकृत पथविक्रेते कोण आहेत, हे ही आम्हाला माहीत नाही. ही निवडणूक मुरुड-जंजिरा नगरपरिषदमध्ये पहिल्यांदाच होत आहे, त्यामुळे सर्वांनमध्येच संभ्रमाचे वातावरण पसरले आहे.

## चार हजार शिक्षक आंदोलनात उतरणार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सुधारीत शिक्षक संच मान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. याविरोधात राज्यातील शिक्षक एकवटले असून २५ सप्टेंबरला एक दिवसाचे सामुहिक रजा आंदोलन करणार आहेत. रायगड जिल्ह्यातदेखील या आंदोलनाची तयारी सुरु असून जिल्ह्यातील चार हजारपेक्षा अधिक शिक्षक या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

ग्रामीण भागातील १ लाख ८५ हजार विद्यार्थी आणि २९ हजाराहून अधिक शिक्षकांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने हे दोन्ही निर्णय रद्द करावेत यासाठी राज्यभरातील सर्व शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली. तरीदेखील मागण्यांच्या पूर्ततेसाठी सरकारने कोणतीही पाऊल उचलले नाही. यामुळे सर्व शिक्षक संघटना



आंदोलनावर ठाम आहेत. शिक्षक सामुहिक रजेवर जाणार असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. शिक्षक संघटनांनी येत्या २५ सप्टेंबरला आंदोलनाची हाक दिली आहे. बैठकीला शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन उपस्थित होते. या बैठकीत अनेक निर्णय या सर्वानुमते घेण्यात आले होते.

# लाखोंचे कर्ज देण्याची तयारी हेच पतसंस्थेचे यश

**। पनवेल । वार्ताहर ।**

गावोगवी आणि शहरी भागांमध्ये अनेक पतसंस्था कार्यरत आहेत. मात्र, गेली अनेक वर्षे रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण ही माध्यमिक शिक्षकांची पतसंस्था शिक्षक सभासदांना २५ लाख रूपयाचे कर्ज थोडक्याच कागदपत्रांवर मंजूर करते. यातूनच पतसंस्थेच यश दिसुन येत आहे, असे प्रतिपादन रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक अलिबागचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांनी केले.




### सुरेश खैरे यांचे प्रतिपादन

पेणच्या पतसंस्थेच्या ३३ व्या सर्वसाधारण सभेत ते पुढे म्हणाले की, पतसंस्थेचे पदाधिकारी व संचालकांनी सभासदांचे विश्वस्त म्हणून कार्य केले तर नक्कीच पतसंस्थेचे हित जपले जाईल, यात शंका नाही. यावेळी पतसंस्थेचे नवनिर्वाचीत अध्यक्ष राजेंद्र पालवे यांनी भविष्यात पतसंस्थेचे कार्य भरभराटीला कसं जाईल, याकडे मी व माझे संचालक मंडळ लक्ष देणार आहे. तसेच, सर्व सभासदांचे हित जपले जाईल, असे मत व्यक्त केले. यावेळी सभासदांमधील गुणवंत आदर्श शिक्षक, १० वी व १२ वी मध्ये यशस्वी झालेल्या सभासद पाल्यांना सन्मानचिन्ह, भेटवस्तू व रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या सर्वसाधारण सभेसाठी पॅनलप्रमुख नरसू पाटील, सल्लागार जी. एम. पाटील, सुरेश पालकर, बी.पी. म्हात्रे, रमेश म्हात्रे, जयसिंग गोळे, रविंद्र घोसाळकर, टी.बी.मोकल, राजेंद्र पवार, के.पी.पाटील तसेच पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पालवे, उपाध्यक्ष अरूण बेरे यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## कावळ्यांचे अस्तित्व संपुष्टात

**। पनवेल । वार्ताहर ।**

खांदा वसाहतीत दोन दिवसांपासून विविध ठिकाणी कावळे मृत अवस्थेत तर काही अस्वस्थ आढळून येत आहेत. दोन दिवसांपूर्वी पहाटेपासून मोठ्या प्रमाणावर दुर्गंध पसरला होता. यामुळे अनेक नागरिकांना पहाटे मॉर्निंग वॉक करताना त्रास होत होता. मात्र, यावर कोणत्याही राजकीय पक्ष तसेच सरकारी अधिकारी प्रशासनाचे लक्ष गेले नाही. तळोजा येथून अनेक वेळा केमिकलयुक्त पाणी नदीत सोडले जात आहे. याचे परिणाम खांदा वसाहत तसेच खारघर, कामोठेवासीयांना सोसावे लागत आहे. यामुळे नागरिकांना श्वास घ्यायला त्रास होत आहे. तसेच याचा दुष्परिणाम पशू-पक्षांनाही जाणवत असल्याचे मत येथील नागरीकांनी व्यक्त केले आहे.

# सुमित्र ग्रामीण बिगरशेतीची सभा

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा येथील सुमित्र ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. रेवदंडा मोठे बंदर येथील भंडारी समाज सभागृहात रविवारी (दि.२२) ही सभा आयोजीत करण्यात आली होती. या सभेचे अध्यक्षस्थान पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष कमळाकर साखळे यांनी भुषविले होते.

यावेळी उपाध्यक्ष खलिल तांडेल, संचालक महेंद्र नाईक, उमेश कोंडे, राजेंद्र वाडकर, अशोक हवालदार, विजय चौलकर, सदानंद घरत, प्रतिभा वरसोलकर, कमरजब्बीन मुकादम, तज्ञ संचालक सलिम तांडेल, मालती ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक



नागांवकर यांची उपस्थिती होती.

या सभेत विविध कार्यक्रमांसोबत दहावी व बारावी इयत्तेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व विशेष कार्याने प्रसिद्धीस आलेले प्रमोद नवखारकर, शिक्षीका विजया मोकल, उच्चशिक्षीत अब्दुल मुकादम, सुष्टी खोत, नलिनी मुंबईकर यांचा विशेष सत्कार पतसंस्थेच्यावतीने करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व लेखा परिक्षण अहवाल वाचन पतसंस्थेच्या व्यवस्थापिका क्रांती जाधव यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक नागांवकर, कमळाकर साखळे यांचे विशेष मार्गदर्शन या सभेला मिळाले.

## आयोटेक वर्ल्ड, इफको भागीदारीमुळे उत्पादनात वाढ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतातील आघाडीची ड्रोन तंत्रज्ञान कंपनी आयोटेकवर्ल्ड एविगेशन आणि एक प्रमुख सहकारी संस्था इफको यांच्या भागीदारीमुळे डिसेंबर २०२३ पासूनच्या केवळ ८ महिन्यांत ११ भारतीय राज्यातील ५०० पेक्षा जास्त शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांवर सकारात्मक परिणाम झाला आहे. या भागीदारीतून ५०० ड्रोन शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी समर्पित केले गेले आहेत. या उपक्रमाचा उद्देश शेती पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणणे आणि भारतातील शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचा आहे.

नुकतीच आयोटेकवर्ल्ड आणि इफको यांनी एग्रीबोट ड्रोन ग्राहकांसाठी एक विशेष मर्यादित कालावधीसाठी ऑफर जाहीर केली आहे. ज्यात शेतकरी आणि सेवा प्रदात्यांना आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची संधी मिळणार आहे. या अनन्य प्रोत्साहन योजनेअंतर्गत इफको एग्रीबोट ड्रोन कोणत्याही एकर मर्यादेशिवाय देत आहे. ज्यामुळे सहभागी शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा होऊ शकतो.

# पनवेलमध्ये खुनाच्या आरोपीला अटक

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील ओरियन मॉलच्या मागे एका इसमास गळा आवळून ठार मारण्यात आले होते. या गुन्ह्याचे कोणतेही धागेदोरे नसताना पनवेलच्या गुन्हे शाखा कक्ष पथकाने तांत्रिक तपासाआधारे पनवेलमधून एका आरोपीला अटक केली आहे. असे असले तरी मयत इसमाची अजूनही ओळख पटलेली नाही.

शहरातील ओरियन मॉलच्या मागील बाजूस असलेल्या झाडीमध्ये एका इसमाला काही दिवसांपूर्वी बेल्टच्या सहाय्याने गळा आवळून ठार मारण्यात आले होते. याबाबतचा गुन्हा



पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे वपोनि उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण फडतरे, मानसिंग पाटील, प्रताप देसाई, अजित कानगुडे, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार रमेश शिंदे, अनिल पाटील, मधुकर गडगे, प्रशांत काटकर, तुकाराम सुर्यवंशी, रणजित पाटील, सागर रसाळ, पो.ना.अजिनाथ फुंदे, लवकुश शिंगाडे, अजित पाटील, विक्रांत माळी आदींच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे आरोपी धिरज राजू शर्मा (२७) याबाबत माहिती मिळाली.

त्यानुसार त्याला ताब्यात घेतले असता दोघांमध्ये दारु पित असताना वाद होऊन बाजूला पडलेल्या बेल्टच्या आधारे गळा आवळून त्याला ठार मारले आहे. या आरोपीला पनवेल शहर पोलीस ठाण्यात पुढील तपासासाठी ताब्यात देण्यात आले आहे.

# गव्हाणकर शाळे सीसीटिव्हीचे जाळे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माथेरान येथे असलेल्या प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटिव्ही कॅमेरांचे जाळे बसविण्यात आले आहे. माथेरान शहरातील केबल व्यवसायिक अल्ताफ केबलवाले यांनी शाळेसाठी सीसीटिव्ही कॅमेरे सर्व यंत्रणासह उपलब्ध करून दिले आहेत. दरम्यान, माथेरानमधील गव्हाणकर विद्यामंदिरात सीसीटिव्ही कॅमेरे कार्यान्वित झाले असून शाळेतील विद्यार्थी सुरक्षित होण्यास मदत झाली आहे.



माथेरानमध्ये मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा शहराच्या एका भागात असून त्या ठिकाणी आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर जंगल आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थी सीसीटीव्ही कॅमेराच्या नजरेत असावेत, अशी शाळेची अपेक्षा होती. मात्र, खासगी संस्था असल्याने शाळेत ही व्यवस्था करणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नव्हते. यातच बदलापूर येथील शाळेत घडलेली घटना लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला होता. यामुळे पालकवर्ग याबाबत शाळा व्यवस्थापनाकडून अपेक्षा करीत होते. पालक वर्गाची ही मागणी लक्षात घेत माथेरानमधील केबल व्यवसायिक असलेले अल्ताफ केबलवाले यांनी प्राचार्य गव्हाणकर विद्यामंदिरात सीसीटिव्ही कॅमेरे बसवून देण्याचा निर्णय घेतला.

अल्ताफ केबलवाले यांनी संस्थेची परवानगी घेऊन आपल्या डेन केबलच्या माध्यमातून सीसीटिव्ही कॅमेरे बसवून दिले. हे कॅमेरे विद्या मंदिरातील वर्गखोल्या इयत्ता आठवी, नववी, दहावी या ठिकाणी तसेच शौचालयाकडे जाणारा मार्ग, खेळाचे मैदान, प्रयोगशाळा येथे बसवून घेण्यात आले आहेत.

## कामोठ्यात कारची चाके चोरीला

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामोठ्यात भुरट्या चोरांनी आता चोरी करण्याचा मोर्चा रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्यांकडे वळवला आहे. रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या व्हॅगनार गाडीचे मागील टायर सहित दोन चाक काढून नेल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून चोरट्यांचा तपास सुरू आहे.

कामोठे येथील सेक्टर-१९ मध्ये प्रेसिडेन्सी हाऊसिंग सोसायटीमध्ये विनायक शिराळकर हे राहतात. व्यवसायाने सोसायटी लेखापरीक्षण करणारे लेखापरीक्षक आहेत. त्यांच्या मालकीची (एम एच-०२-सीबी-१६३३) व्हॅगनार गाडी त्यांनी सोसायटीच्या जवळील रस्त्यावर उभी करून ठेवली होती. मात्र, चोरट्यांनी या गाडीचे लॉक तोडून आतील सामान अस्ताव्यस्त केले. गाडीतला जॅक काढून टायर्स सहित चाकं काढली.

## वेश्या व्यवसायात ओढणारा दलाल जेरबंद

**। पनवेल । वार्ताहर ।**

गोरगरीब मुलींचा व महिलांचा देह व्यवसायासाठी उपयोग करणारा दलाल नवी मुंबई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाकडून जेरबंद करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या पथकाकडून ही धडाकेबाज कामगिरी करण्यात आली आहे. आरोपी वैजद अली खान उर्फ राजू मंडल (२९) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर, संशयित मोतीन व शायना यांचा पोलीस शोध घेत आहेत.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाकडून वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमधील करंजाडे परिसरात सापळा रचत या दलालाला अटक करण्यात आली आहे. यासंबंधित आणखी दोघांचा शोध पोलीस घेत आहेत. सापळा कारवाईत तीन महिला व एक बांगलादेशी महिलांची सुटका करण्यात आली आहे. आरोपी वैजद अली खान उर्फ राजू मंडल हा कुख्यात दलाल असून तो मोतीनच्या साथीने गरीब महिलांना पैशाचे आमिष देऊन त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत होता. तसेच, कारवाईत अल्पवयीन बांगलादेशी मुलीचा पुरवठा शायना या महिला दलालाने केला होता. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात पिटा अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## दिवकर यांना कृषीभूषण पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रोहा तालुक्यातील संतोष दिवकर यांना शासनाचा कृषी भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल त्यांना विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांच्या सहीचे नुकतेच शासनाचे पत्र देण्यात आले.



संतोष काशीनाथ दिवकर हे रोहा तालुक्यातील यशवंतखार येथील रहिवासी आहेत. सामाजिक क्षेत्रात त्यांचे चांगले योगदान राहिले आहे. शेतीवर नवनवीन प्रयोग करून आधुनिक पद्धतीने सेंद्रीय शेती करण्यावर त्यांनी भर दिला. शेती क्षेत्रात आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवनवीन प्रयोग करीत एक प्रगत शेतकरी म्हणून ते आदर्श ठरले आहेत. त्यांचे कौतुक होत आहे.

### विविध पक्ष्यांना रोज मिळतो मेजवानीचा आस्वाद

# बेणसेतील अवलियाचे अनोखे पक्षीप्रेम

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

**आपण वेगवेगळ्या पद्धतीचे पक्षीप्रेम पाहतो. मात्र, शिट्टी वाजवताच वेगवेगळ्या प्रकारचे शेकडो पक्षी एका ठिकाणी दाखल होतात, असे अनोखे पक्षीप्रेम आपण कधीच पाहिलं नसेल. रायगडच्या पेण तालुक्यातील बेणसे येथील भास्कर पाटील या अवलियाचे अनोखे पक्षीप्रेम पाहून सारेच अचंबित होत आहेत. त्यांच्या एका शिट्टीच्या आवाजाने पक्षांचे थवे भास्कर पाटील यांच्या घराजवळ दाखल होत पहाटे न्याहारीचा आस्वाद देखील घेत असतात. हा उपक्रम एक-दोन दिवसांपुरताच नाही तर सलग दोन वर्षे न चुकता भास्कर पाटील या पक्ष्यांच्या आहाराची विशेष काळजी घेत आहेत.**



पर्यावरणाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. अशातच वाढते उद्योगधंदे, कारखानदारी, औद्योगिकीकरण यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जात आहे. तसेच, वणव्यांमुळे जंगले देखील नष्ट होत आहेत. यामुळे पक्षांचे अधिवास असलेल्या वृक्षांचे अस्तित्वच नष्ट होत असल्याने पक्षांचे खाद्य निर्मितीची ठिकाणे ओसाड होत चालली आहेत. काही वर्षांपूर्वी पक्षांचा मोठ्या प्रमाणात किलबिलाट ऐकू येत होता. परंतु, आता किलबिलाट सोडाच पक्षांची घरटी देखील दिसेनाशी झाली आहेत. त्यांच्या संख्येतही कमालीची घट झाली आहे. एकूणच पक्षांच्या अस्तित्वाची चिंता भेडसावू लागली आहे.

अशातच भास्कर पाटील यांच्यासारख्या तरुणाने मानवतावादी आणि सेवाभाव जपण्याचे काम हाती घेतले आहे. ते दररोज आपल्या उत्पन्नातील काही भाग पक्षी प्रेमाखातर खर्ची करत असतात. ते दररोज चणे, गाठी शेव, चपाती, तांदूळ आणि गहू आदी पदार्थ पक्षांना खाऊ घालत असतात. यावेळी पक्षी देखील पाटील यांचे न्याहारीचे आमंत्रण स्वीकारून बिनधोकपणे येत असतात. त्यांनी मारलेली शिट्टी आसमंतात गुंजताच दूरवरचे पक्षी काही क्षणात पाटील यांच्या घराजवळील शाळा, झाडे, घरांची कौले यावर स्थिरावतात.

त्यानंतर भास्कर पाटील रस्त्यावर, छपरावर धान्य व इतर साहित्य टाकतात आणि मग पक्षी या भोजनाचा मनसोक्त आस्वाद घेऊन पुन्हा एक उंच भरारी घेऊन आसमंतात जातात.

> कावळे, चिमण्या, कबुतर, कोंबड्यांना रोज मेजवानी मिळते. पक्षी माझ्या शिट्टीच्या निमंत्रणाला मान देऊन अन्न-धान्य खाण्यासाठी आवर्जून येत असतात. ही बाब माझ्यासाठी खूप आनंद व समाधान देणारी आहे.
>
> – भास्कर पाटील, पक्षीप्रमी

### प्रत्येक जिवाला स्वातंत्र्य आहे

**भास्कर पाटील म्हणतात की, प्रत्येक जिवाला स्वातंत्र्य आहे. त्याला मनसोक्त जगण्याचा अधिकार आहे. पक्षांना पिंजऱ्यात कैद करण्यापेक्षा त्यांच्यावर प्रेम करा, त्यांची काळजी घ्या, त्यांना खाऊपिऊ घाला. यातच मोठं समाधान आहे आणि हीच खरी सेवा आहे. तसेच, पशुप्रेमी, प्राणीप्रेमी व नागरिकांना ते आवाहन करतात की, जैवविविधता टिकवून जर पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर प्रत्येक सजीवांची कुटुंबातील सदस्यांप्रमाणे काळजी घेतली पाहिजे.**

# तिरुपतीच्या नावानं...

तेलुगु आणि तमीळ सिनेमा उद्योग बॉलिवूडपेक्षा भारी आहे. सिनेमांची संख्या जास्त आहेच. शिवाय ते धंदाही प्रचंड करतात. भयंकर मारामारी, अचाट योगायोग आणि बटबटीत नाटक यांची भरमार म्हणजे हे दक्षिणी सिनेमे. कालांतराने या सिनेमांमधले अनेक नट राजकारणात येतात. एमजी रामचंद्रन, जयललिता, चिरंजीवी ही त्याची उदाहरणे. राजकारणात आले की त्यांच्या नाटकांचा दुसरा अंक सुरू होतो. एनटी रामाराव यांचे उदाहरण प्रसिध्द आहे. ते श्रीकृष्णासारखा मुकुट डोक्यावर घालून आणि भगव्या कपड्यांमध्ये वावरत. आपल्या गाडीची रचना रथासारखी करण्याची मूळ कल्पनाही त्यांचीच. अडवानींची रथयात्रा त्याची नक्कल होती. रामाराव यांचे जावई चंद्राबाबू नायडू हे कधी सिनेमात नव्हते. पण नाटक करण्याचा गुण त्यांच्याकडे भरपूर आहे. २०१९ च्या निवडणुकीत हुकुम शहा मोदी हे देशाला खड्ड्यात घालत आहेत असे ते सांगत होते. आता ते मोदींच्या बाजूने उभे आहेत. आणि, या भाजपचा वाण नाही पण गुण त्यांनाही लागलेला दिसतो. तिरुपतीच्या लाडवांमध्ये प्राण्यांची चरबी सापडल्याच्या कथित प्रकरणावरून त्यांची आरोपबाजी चालवली आहे ती भाजपच्या नतद्रष्ट हिंदुत्ववादी राजकारणाला साजेशी व सोईस्कर आहे. लाडवांमधील तुपात ही चरबी असेल तर ते प्रकरण गंभीर आहे. त्यामुळे शाकाहारी भक्तांना नक्कीच धक्का बसू शकतो. मात्र आधीचे मुख्यमंत्री जगन रेड्डी यांनी जणू मुद्दामच हे सर्व कारस्थान रचले असा जो नायडू यांचा पवित्रा आहे तो धक्कादायक आहे. मालवणमध्ये महाराजांच्या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार झाला, भानगड झाली, नंतर शिल्पकाराला वाचवण्याचा प्रयत्न झाला असा आरोप शिंदे-फडणवीस सरकारवर करता येऊ शकेल. पण भाजपने पुतळा पाडण्याचे हे सर्व कारस्थान रचले असे म्हणणे हे जितके गैर ठरेल तितकेच जगन रेड्डी यांनी जाणीवपूर्वक भेसळवाले तूप वापरणाऱ्याला कंत्राट दिले असे म्हणणेही आक्षेपार्ह होईल. नायडू यांनी यावरून सुरू केलेला तमाशा हा तेलुगु सिनेमाला देखील मागे टाकेल असा आहे.

### चौकशी चोख व्हावी

तिरुपती हे देशातले सर्वात श्रीमंत देवस्थान आहे. रोज सुमारे सत्तर हजार लोक त्याच्या दर्शनाला येतात. प्रत्येक भाविकाला प्रसाद म्हणून एक लाडू मोफत दिला जातो. अधिक हवे असतील तर पन्नास रुपयांना एक असा लाडू विकला जातो. देवस्थानने एक खास स्वयंपाकघर उभारले असून तेथे बेसन, लोणी, तूप इत्यादींपासून हे लाडू तयार होतात. दर दिवशी साडेतीन लाख लाडू तयार केले जातात. त्यासाठी वर्षाला पाच हजार टन तूप लागते. बाजारात तुपाचा दर किलोला सहाशे ते एक हजार रुपये इतका आहे. तिरुपतीला पूर्वापार कर्नाटक राज्य महासंघ म्हणजे नंदिनीतर्फे तूप पुरवले जात असे. गेल्या वर्षी जगन रेड्डी यांच्या सरकारच्या काळात नव्याने निविदा काढण्यात आल्या. त्यात नंदिनीपेक्षाही अनेकांनी कमी दराने तूप देऊ केले. तमीळनाडूतील एआर डेअरीने ३२० रुपये किलोचा दर आकारला. सरकारी कामात कमीत कमी दर घेईल त्याला निविदा दिली जाते. त्यानुसार एआर डेअरीला हे काम मिळाले. पण बाजारापेक्षा निम्म्या दरात हा पुरवठा या कंपनीला कसा शक्य आहे अशी शंका सरकारला तेव्हाच यायला हवी होती. ती आली नाही किंवा त्यात सरकारी अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला असावा. याबाबतच्या चौकशीतून काय ते तथ्य बाहेर येईलच. तूप स्वस्त विकता यावे यासाठी त्यात सोयाबीन, पाम तेल किंवा प्राण्यांची चरबी वा माशांचे तेल मिसळले जाते. सोयाबीन तेल इत्यादींचा दर सुमारे दीडशे रुपयांच्या आसपास आहे. त्यामुळे ते चांगलेच परवडते. एआर डेअरीच्या तुपाचे जे नमुने मिळाले तपासले त्यातही अशीच चरबी व पाम, सूर्यफूल इत्यादी तेलांचे अंश आढळल्याचा आरोप आहे. आता ही भेसळ तूप उत्पादन करताना कंपनीतच झाली की नंतर कोणत्या टप्प्यात झाली वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधून काढावी लागणार आहेत.

### भाजपसाठी तिरुपतीचा प्रसाद

यंदाच्या जून महिन्यात आंध्र प्रदेशात नायडू यांचे तेलुगु देसमचे सरकार आले. त्यांनी तिरुपती देवस्थान समितीवर नव्याने नियुक्त्या केल्या. तेथील लाडवांच्या दर्जाबाबत शंका आल्याने तपासणीसाठी काही नमुने गुजरातमधील प्रयोगशाळेत पाठवले गेले. त्यावेळी ही भेसळ नजरेस आली. त्यानंतर एआर डेअरीचे कंत्राट रद्द करण्यात आले. कर्नाटकातील नंदिनीला पुन्हा कंत्राट दिले गेले. गंमत अशी आहे की, हे सर्व घडले ते जुलै महिन्यात. मात्र नायडू यांनी याचे आरोप केले ते मात्र सप्टेंबर महिन्यात. शिवाय ते करतानाही भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्याच्या मुद्द्यावर त्यांनी सर्वाधिक भर दिला. वास्तविक, आंध्र किंवा तेलंगणातील ९५ टक्के लोक मांसाहार करतात. त्यामुळे एरवी तिथे गुजराती किंवा जैन पध्दतीने मांसाहाराचा मुद्दा तिथे पेटूच शकत नाही. पण मंदिरातल्या प्रसादाचा प्रश्न असल्याने भक्त आणि त्यांच्या धार्मिक भावनांचा प्रश्न निर्माण झाला. त्यातच तिरुपतीचे भक्त देशात सर्वत्र पसरलेले आहेत. त्यामुळे हरियाणा आणि जम्मू काश्मीरच्या निवडणुकांसाठी फायदा व्हावा म्हणून नायडूंनी हा तिरुपतीचा प्रसाद भाजपला पाठवला आहे की काय अशी शंका निर्माण झाली आहे. भाजपनेही अगदी आनंदाने हा प्रसाद स्वीकारला. केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी नड्डा यांनी तत्परतेने चौकशीचे आदेश दिले. दुसरीकडे तिरुपती देवस्थानात झालेल्या चुकीबद्दल क्षमायाचना करण्यासाठी एक सोमवारी एक शांती यज्ञ करण्यात आला. लगोलग विश्व हिंदू परिषदेनेही सोमवारी एक बैठक आयोजित केली व तिच्यात याची चर्चा झाली. या सर्वांचे ठीक आहे. त्यांना लोकांच्या भावना भडकावून आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे. पण चंद्राबाबू नायडूंसारख्या प्रागतिक राजकारण्याने या थराला जावं हे वाईट झालं. मध्यंतरी उत्तर प्रदेशात नेस्लेच्या मॅगीमध्ये अशीच भेसळ झाल्याची बोंब झाली होती. पतंजलीची नूडल्स खपावीत म्हणून तो सगळा बनाव रचला गेला होता. तसली काही भानगड यात नाही नाही ना हेही पाहायला हवे.

---

**विचार**

# राजीनामास्त्र केजरीवालांना तारणार?

***आतिशी यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्यानंतर अरविंद केजरीवाल पुढचे चार महिने राजीनाम्याच्या 'इमोशनल ड्राम्या'चा इव्हेंट करणार आहेत. यामुळे हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचे गणित बिघडू शकते. परिणामी केजरीवालांच्या जामिनाच्या टायमिंगवर चर्चा होत आहे. केजरीवाल यांचे हे राजीनामास्त्र कितपत यशस्वी होणार, याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. तिचा थेट दिल्लीमधून घेतलेला वेध.***



**प्रमोद मुजुमदार**

दिल्लीतील वेगवान घडामोडी देशाचे लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. येथे अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर आतिशी मार्लेना मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळत आहेत. त्यांच्या रुपाने दिल्लीला एक उच्चशिक्षित मुख्यमंत्री लाभणार आहेत. अरविंद केजरीवाल यांच्या निकटवर्तीय ही त्यांची ओळख देशाला आहेच. अलिकडे केजरीवाल आणि मनिष सिसोदिया हे दोघे तुरुंगात असताना बहुतांश प्रमुख खाती त्यांच्याकडेच होती. तेव्हा या उच्चशिक्षित आणि तरुण मुख्यमंत्र्यांकडून चांगल्या कारभाराची अपेक्षा ठेवणे चुकीचे ठरणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांना जामिन देताना अनेक अटी घातल्या. उदाहरणार्थ, कोणत्याही शासकीय कागदपत्रांवर सह्या करायच्या नाहीत, उपराज्यपालांच्या परवानगीखेरीज न्यायप्रविष्ट असणाऱ्या खटल्यावर काहीही बोलायचे नाही, टीकाटिपण्णी करायची नाही, असे या अटींचे स्वरुप आहे. कोणत्याही निर्णयावर ते हस्ताक्षर करु शकत नाहीत तसेच कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत. दुसरीकडे, विधानसभेची मुदत संपण्यास सहा म हिन्यांचा अवधी शिल्लक आहे. वस्तुतः केजरीवाल यांनी राजीनामा न देता दिल्ली विधानसभा भंग करुन नव्याने निवडणुकीला सामोरे जाणे श्रेयस्कर ठरले असते. कारण उरलेल्या सहा महिन्यातील बराच काळ प्रचार आणि आचारसंहितेमध्येच व्यतित होणार आहे. त्यामुळेच नवनिर्वाचित मुख्यमंत्री किती काळ सत्तेत राहणार आणि किती काळ निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करु शकणार, हा प्रश्न उरतो. खेरीज आतिशी यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाली असली तरी त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ आणि या पदावर दावा सांगणारी बरीच मंडळी आपमध्ये आहेत. त्यामुळेच दिल्लीतील राजीनामानाट्याकडे लक्ष वेधले गेले आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना जामीन देताना 'सीबीआय'वर अप्रत्यक्ष ताशेरे ओढले. पिंजऱ्यातला पोपट होऊ नका, असे बजावले. त्याच वेळी केजरीवाल यांना जामीन दिला असला, तरी काही बंधने घातली होती. गेल्या १७७ दिवसांपासून तुरुंगात असल्यामुळे त्यांना कारभार पाहता येत नव्हता, तर आता तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांना सह्यांचे अधिकार नव्हते. त्यामुळे त्यांच्या मुख्यमंत्री राहण्यालाही काही अर्थ नव्हता. भाजपने केजरीवाल यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. आता त्यांनी राजीनामा देण्याची घोषणा केली असल्याने भाजपला हर्षवायू व्हायला पाहिजे होता; परंतु तसे झालेले नाही. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केजरीवाल यांच्यावर 'उशिरा सुचलेले शहाणपण' अशा शब्दांमध्ये टीका केली असली, तरी त्यांच्या राजीनाम्याच्या घोषणेचा धसका भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी घेतला आहे.

दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आणखी पाच महिन्यांनी होणार आहेत. केजरीवाल पुढचे चार महिने राजीनाम्याच्या 'इमोशनल ड्राम्या'चा इव्हेंट करणार आहेत. त्याचा फटका भाजप आणि काँग्रेसला बसेल; परंतु त्यापूर्वी होणाऱ्या हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे गणित बिघडू शकते. त्यामुळे केजरीवालांच्या जामिनाच्या टायमिंगची चर्चा झाली. त्यांची तिहार तुरुंगातून सुटका झाल्यानंतर राजकारण चांगलेच तापले. केजरीवाल यांच्या 'सरप्राईज एलिमेंट'ने विरोधकांना विचार करायला भाग पाडले. केजरीवाल यांचे हे पाऊल कितपत यशस्वी होणार, हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे.

दिल्लीमध्ये लवकरात लवकर निवडणुका घेण्याची मागणी आम आदमी पक्षाच्या निमंत्रकांनी केली आहे. फेब्रुवारी २०२५ ऐवजी महाराष्ट्र आणि झारखंडबरोबर दिल्ली विधानसभेची निवडणूक घेण्याची मागणी आहे. हरियाणा आणि जम्मू-काश्मीरच्या निवडणुकांबाबत आधीच राजकीय गोंधळ सुरू आहे. येत्या काही म हिन्यांमध्ये महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये निवडणुका आहेत. यासोबतच दिल्लीचीही निवडणूक होऊ शकते, असे मानले जात आहे. अशा स्थितीत केजरीवाल यांनी राजीनामा देऊन खेळलेले 'इमोशनल कार्ड' जनता मनावर घेते का, हे पाहणे रंजक ठरणार आहे. केजरीवाल यांच्या या निर्णयामुळे 'आप'ला निवडणूक जिंकता येईल का, काँग्रेससह भाजपसाठी हे किती मोठे आव्हान असेल, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे जाणून घेतली पाहिजेत. केजरीवाल यांनी तीन वेळा दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. गेली दहा वर्षे ते सातत्याने दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. एवढ्या प्रदीर्घ कार्यकाळानंतर सरकारबाबत जनतेमध्ये सत्ताविरोधी नाराजी आहे. केजरीवाल यांना याची पूर्ण जाणीव असावी. त्यामुळेच त्यांनी राजीनाम्याची खेळी खेळली. यामुळे जनतेमधील सरकारबद्दलची नाराजी नक्कीच दूर होईल, अशी आशा पक्षनेतृत्वाला आहे. या निर्णयामुळे सत्ताविरोधी लाटेचा प्रभाव कमी होऊ शकतो.

दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाबाबत भाजप दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारसमोर सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहे. केजरीवाल यांच्यावर सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. इतकेच नाही, तर तुरुंगात असताना भाजपकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात होती. त्या वेळी केजरीवाल यांनी तो दिला नाही. आता तुरुंगातून बाहेर येताच त्यांनी राजीनामा देऊन भाजपला बॅकफूटवर ढकलले आहे. त्यामुळेच केजरीवाल यांनी तुरुंगातून सुटल्यानंतर राजीनामा का देऊ केला, असा सवाल आता भाजपच उपस्थित करत आहे. भाजपने कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला असला, तरी केजरीवाल यांची नवी रणनीती कितपत प्रभावी ठरेल, हा प्रश्न आताही उरतोच, हे आगामी निवडणुकीनंतरच ठरणार आहेत. केजरीवाल कोणताही निर्णय घेतात, तेव्हा त्यामागे निश्चितच एक खास कारण असते. या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी केजरीवाल आश्चर्यचकित झाले होते. ते तिहार तुरुंगात होते. दिल्लीतील निवडणुकीपूर्वीच त्यांना पॅरोल मिळाला होता. लोकसभा निवडणुकीत त्यांनी पक्षाचा जोरदार प्रचार केला. असे असतानाही दिल्लीतील सातही जागा भाजपच्या वाट्याला गेल्या. केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाची काँग्रेससोबत युती असताना ही परिस्थिती झाली. 'आप' हा विरोधी 'इंडिया' आघाडीचा भाग असतानाही दिल्लीत काँग्रेस किंवा 'आप'ला एकही जागा जिंकता आली नाही.

दिल्लीकरांची मनस्थिती समजून घेऊन केजरीवाल यांनी आता राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. आम आदमी पक्ष हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सर्व ९० जागांवर निवडणूक लढवत आहे; मात्र हरियाणामध्ये पक्षाकडे कोणताही मोठा चेहरा नाही. अशा परिस्थितीत केजरीवाल हेच त्यांचे 'ट्रम्प कार्ड' असेल. अशा स्थितीमध्ये केजरीवाल यांनी हरियाणा निवडणुकीमध्ये जोरदार प्रचार करता यावा, यासाठी विचारपूर्वक रणनीती म्हणून दिल्लीचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा निर्णय घेतला. दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी राहिले असते, तर राष्ट्रीय राजधानीवर त्यांचे विशेष लक्ष राहिले असते. यामुळे हरियाणामध्ये 'आप'चे कार्यकर्ते अधिक सक्रिय होतील आणि त्यांचे मनोबल वाढेल. हरियाणा हे केजरीवाल यांचे गृहराज्य आहे. त्यामुळे पक्ष तेथे जोरदार दावा करेल. अर्थात मागील विधानसभा निवडणुकीमध्ये 'आप'ला जेमतेम एक टक्का मते मिळाली होती, हे ही लक्षात घ्यायला हवे. 'येत्या काळात महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये निवडणुका आहेत. त्यामुळे तिथेही पक्ष केजरीवाल यांच्या 'बलिदानाचा' मुद्दा बनवण्याचा प्रयत्न करेल, जेणेकरून पक्षाला जनतेची सहानुभूती मिळेल.

हरियाणाच्या निवडणुकांमध्ये सत्ताधारी भाजपची स्थिती चांगली नसल्याचे वृत्त सातत्याने येत होते. आतापर्यंत काँग्रेसबाबत सकारात्मक अहवाल येत होते; मात्र आता केजरीवाल हरियाणामध्ये सक्रिय झाल्याने हा खेळ बिघडण्याची भीती काँग्रेसच्या मनात आहे. गेल्या काही दिवसांपासून 'आप' आणि काँग्रेस यांच्यात युतीचे प्रयत्न सुरू होते; पण जेमतेम पाच-सहा जागा देऊ केल्याने 'आप' काँग्रेसवर वैतागला. हरियाणाच्या अनेक भागात 'आप'ची पकड आहे. अशा स्थितीत तिथल्या लोकांमध्ये स्वीकृती वाढली, तर काँग्रेसचा खेळ बिघडू शकतो. काँग्रेसलाही आम आदमी पक्षाला डोळ्यासमोर ठेवून आपली रणनीती बदलावी लागणार आहे.

केजरीवाल चोर आहेत, या भाजपच्या टीकेला प्रत्युत्तर देताना 'मी सत्तेचा खेळ खेळायला आलो नाही, देशासाठी काही तरी करायला आलो आहे' असा पवित्रा ते घेत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या सुशोभीकरणावर ४५ कोटी रुपयांचा खर्च, जलखात्यातील घोटाळ्याच्या अफवा, दारू घोटाळ्यातील कथित सहभागाची चर्चा या सर्व प्रकरणांमुळे केजरीवाल आणि 'आप'ची प्रतिमा डागाळली होती. या पार्श्वभूमीवर केजरीवाल खुर्चीला चिकटून बसणारे नेते नाहीत, असा संदेश जनतेत जाईल. राजीनाम्यामुळे ते जनतेत आपली प्रतिमा सुधारू शकतात. राजीनाम्यामुळे भ्रष्टाचाराविरुद्ध लढणारा योद्धा अशी त्यांची प्रतिमा मजबूत होईल. त्याचा दीर्घकाळासाठी 'आप'ला फायदा होऊ शकतो. अर्थात राजीनामास्त्राने राजकारण किती ढवळून निघते, हे पुढील काही दिवस पहायला मिळणार आहे.

---

**आजकाल**

# अति श्रमामुळे एका सीए मुलीचा मृत्यू आणि सरकार

**संजीव चांदोरकर**

अति कामामुळे आलेला मृत्यू. हा जापनीज भाषेतील शब्द आहे. जपानमध्ये अगदी सामान्य कामगार कष्टकऱ्यांमध्ये वापरला जाणारा.

अतिकामामुळे जगात जर कोणत्या देशात सर्वात जास्त मृत्यू होत असतील तर ते जपानमध्ये.

जपानमधील कामगार कर्मचाऱ्याच्या कार्य संस्कृतीचे, त्यांच्या कामाप्रती असलेल्या निष्ठेचे गुणगान सत्तरच्या दशकापासून ऐकत आलो आहे. ज्याचे बोधामृत भारतातील कर्मचारी कामगारांना देखील पाजले जाते.

''बघा बघा राष्ट्र असे उभे राहते''

जणू काही राष्ट्र म्हणजे एखादी चकचकीत बहुमजली इमारत आहे. सतत राष्ट्राबद्दल बोलायचे. राष्ट्रामधील रक्तामासाच्या माणसांबद्दल बिलकुल बोलायचे नाही.


हे बोलणारे सारे लोक जपानमधील ''करोशी'' मृत्यू बद्दल काही बोलत नाहीत किंवा खरेतर त्यांना त्या बद्दल माहिती पण नसते.

जापनीज सरकार सांगते काही शे ''करोशी'' मृत्यू होतात. संशोधक कार्यकर्ते सांगतात की हा आकडा १०,००० आहे.

(अधिक माहिती साठी फक्त गूगल करावे)

पुण्यातील अर्न्स्ट अँड यंग मधील तरुण सनदी लेखापाल मुलीचा कार्यालयीन कामामुळे मृत्यू झाल्याची बातमी सध्या चर्चेत आहे.

दुःखद घटना. तिच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण देखील सहभागी होऊया.



मानवी मानवाधिकार आयोगापासून अनेकांनी या घटनेची दखल घेऊन चौकशी सुरू केली आहे. त्याचे स्वागत.

अर्न्स्ट अँड यंग सारखी बहुराष्ट्रीय एलिट कंपनी सर्वात कशाला घाबरत असेल तर बदनामीला. त्यामुळे या प्रकरणात ती सक्रिय हस्तक्षेप करेल हे नक्की.

यानिमित्ताने सर्वच क्षेत्रातील कामगार कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणी होणारे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक नुकसानीचा विषय सार्वजनिक व्यासपीठांवर आला पाहिजे.

प्रश्न सिस्टिम मधून येतो. या सगळ्यातील गाभा आर्थिक आहे. त्यात न कळण्यासारखे काही नाही.

कंपनीचा नफा = कंपनीची विक्री वजा कंपनीचे सर्व खर्च.

सर्व खर्चामध्ये प्रामुख्याने कच्चामाल , युटीलिटीज, मत्तांवर होणारे खर्च, घसारा, भांडवलावर होणारे खर्च (व्याज) आणि कामगार कर्मचाऱ्यांवर होणारे खर्च मोडतात.

नफा वाढवायचा असेल तर खर्च नियंत्रित करावे लागतात. कमी ठेवावे लागतात. वरील सर्व खर्चांच्या प्रकारात कामगार कर्मचाऱ्यावरील खर्चाला सोडून बाकीचे सारे खर्च बाह्य एजन्सी किंवा मार्केट ठरवते. व्यवस्थापनाचे त्यावर फार नियंत्रण चालत नसते.

कामगार कर्मचाऱ्यांवरील खर्च सॉफ्ट टार्गेट आहे. तो एकमेव खर्च असा आहे ज्यावर व्यवस्थापनाचे नियंत्रण असू शकते.

विक्री वाढवायची असेल तरी देखील पुन्हा एकदा कामगार कर्मचाऱ्यांचे प्रति कामगार/कर्मचारी आउटपुट वाढवावे लागते.

म्हणजे वरील समीकरणाच्या उजव्या बाजूला मार फक्त कामगार, कर्मचाऱ्यांवर पडणार त्यामुळे व्यवस्थापनाचा सारा भर कामगार कर्मचाऱ्यांकडून प्रति तास , प्रति रुपया जास्तीत जास्त आऊटपुट काढून घेण्यावर असतो.

अर्धवट अर्थशास्त्री ''मग त्यांना ओव्हर टाईम देतात ना'' वगैरे तारे तोडतील. पण माणूस म्हणजे काही काम करण्याचे किंवा पैसै कमावण्याचे अजून एक मशीन नाही हे कळणे त्यांच्या बौद्धिक आकलनाच्या पलिकडचे आहे.

या सगळ्यात शासन व्यवस्था कुठे आहे?

---

**लोकसंसद**

## आपला तो बाब्या...

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मागच्या रविवारी झारखंडमधील जमशेदपूर येथे झारखंड सरकारच्या 'मुख्यमंत्री मैय्या सन्मान योजना' या महिलांसाठी आर्थिक लाभाच्या योजनेवर टीका करताना म्हटले की अशा योजना बोगस-भंपक आहेत, बिनकामाच्या आहेत. अशा योजना तुमच्या खिशावर डल्ला मारणाऱ्या आहेत. त्यामुळे जनतेने अशा सरकारला सत्तेतून बाहेर खेचायला हवे. साधारण दोन वर्षापूर्वी उत्तरप्रदेशातील बुदेलखंड द्रुतगती महामार्गाच्या उद्घाटनानंतर एका जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मतांसाठी जनतेला मोफत सेवा, वस्तू वाटप करणाऱ्या राजकीय पक्षांना टीकेचे लक्ष्य केले होते. त्यावेळी ते म्हणाले होतै की आपल्या देशात 'रेवडी' वाटून मते मागण्याची संस्कृती रुजत असून ती देशाच्या विकासासाठी अत्यंत घातक आहे. पंतप्रधान विरोधकांवर अशी सातत्याने टीका करताना भाजप सत्तेत असलेल्या सरकारतर्फेही सुरु करण्यात आलेल्या मोफत योजनांबद्दल अवाक्षरही काढत नाहीत. मध्यप्रदेश सरकारची 'लाडली बहन योजना', महाराष्ट्र सरकारची लाडकी बहिण योजना' याबाबत पंतप्रधानांची भूमिका काय ते कळले असते तर बरे झाले असते. नाहीतर पंतप्रधानांची टीका म्हणजे आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्ट याहून वेगळी नाही.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी**

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२४ सप्टेंबर**

**१८८७ :-** मराठी ख्रिस्ती साहित्य सेवा मंडळाचे संस्थापक लेखक, कवी भास्कर कृष्ण उजगरे यांचा जन्म. त्यांच्या प्रयत्नानेच मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनास सुरुवात. 'मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा इतिहास' हे पुस्तक त्यांनी लिहिले. त्यांची काव्य मनोहर बंधू या टोपणनावाने 'ज्ञानोदय व बालबोधसेवा' या मासिकातून येत असत. तसेच ज्ञानोदय पत्रातून त्यांनी बरेच स्फुटलेखन केले. रेव्हरंड टिळकांना गुरुस्थानी मानणाऱ्या भास्कररावांनी टिळकांची समग्र कविता' मोठ्या कष्टाने गोळा करुन प्रसिध्द केल्या. त्या 'टिळकांची कविता- पुस्तक पहिले व दुसरे', 'अभंगाजली', टिळक यांच्या राष्ट्रीय कविता' याशिवाय महाराष्ट्र शब्दकोशासाठी त्यांचे मोलाचे योगदान आहे. **१९१६ :-** लेखिका सुमती नारायण खारकर यांचा जन्म. यांच्या नावावर 'क्रेप कागदातून पुष्परचना' या ग्रंथातून त्यांनी क्रेप कागदापासून पाने, फुले, पराग, कळ्या करण्याचे तंत्र सांगितले आहे. **१९२१ :** लेखक, समीक्षक, संशोधक डॉ. सखाराम गंगाधर मालशे यांचा जन्म २४ सप्टेंबर १९२१ रोजी झाला. एम.ए. झाल्यावर मराठीची प्राध्यापकी त्यांनी केली. 'फादर स्टीफन्सकृत ख्रिस्त पुराण' भाषिक अभ्यास या विषयावर त्यांनी पीएचडी केली. मराठी संशोधन पत्रिका, महाराष्ट्र साहित्य पत्रिका आदी नियतकालिकांचे संपादकही ते होते. लेखनाच्या सुरुवातीला 'व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथा', हसा आणि लठ्ठ व्हा' ही संपादने केली. त्यांच्या लघुकथा, कादंबरी, विनोदी आदी लेखांचा संग्रहही 'आवडनिवड' या नावाने प्रसिद्ध झाला. नीरक्षीर हा नाट्यविषयक लेखांचा संग्रही त्यांचा प्रकाशित झाला. या संग्रहातून पाश्चात्य नाट्यकृती व दिग्दर्शकांसंबधीचे लेख आहेत. यातून त्यांची विश्लेषक बुद्धी, तडेतोड मांडणी आणि मार्मिक विचार यांचे दर्शक या लेखमालेतून घडते. कालांतराने मालशे ऐतिहासिक दृष्टीने विचार करणारे संहिताभ्यासक, संपादक व समीक्षक म्हणून ओळखले जाऊ लागले. केशवसुतांच्या कवितांचे हस्तलिखित, सावरकरांच्या अप्रसिद्ध कविता, लोकहितवादी कृत जातीभेद, दोन पुनर्विवाह प्रकरणे, स्त्री-पुरुष तुलना अशा अनेक संहितात्मक पुस्तिका त्यांनी प्रसिद्ध केल्या. मालशे यांनी धनंजय कीर यांच्या सहकार्याने ज्योतीराव फुले कृत शेतकऱ्यांचा आसूड, महात्मा फुले समग्र वाङ्मय तसेच गो. ना. माजगावकरांचे संकलित वाङ्मय, झेंडूची फुले हे सर्व ग्रंथ त्यांचा सापेक्षी संपादनाचा प्रत्यय घडवतात. त्यांचे आणखी एक मोलाचे कार्य म्हणजे 'थिअरी ऑफ लिटरेंचर' या पुस्तकाचा 'साहित्य सिद्धांत' असा अनुवाद केला. या ग्रंथातून साहित्यसमीक्षा, साहित्यसंशोधन, साहित्योतिहास, साहित्यभासाच्या पद्धती यासंबंधी चर्चा केली आहे. याशिवाय यूजिन ओनीलच्या 'स्टॅज इंटरल्पूड' या नाटकाचा अनुवाद 'सुख पाहता' असा केला. त्यांच्या साहित्यातून त्यांची विश्लेषक बुद्धी, सडेतोड मांडणी आणि मार्मिक विचार दर्शन घडते. ७ जून १९९२ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. **१९२२ :-** कथा-कादंबरीकार आणि सोबत साप्ताहिकाचे संपादक गणपत वासुदेव बेहरे यांचा जन्म. 'ओली आठवण', 'कामदेवाच्या कथा' हे कथासंग्रह, तर 'अखेरचा प्रयोग' हे नाटक, 'मोरपिसारा' हे काव्य आणि 'वाकडी वळणे', 'दिशाहीन', 'कापुरुष', 'झुंज' मिळून २० कादंबऱ्या प्रसिध्द शृंगार आणि विवाहबाह्य संबंध हा त्यांच्या कादंबऱ्यांचा विषय आहे. 'आनंदयात्रा' हे आत्मचरित्र लिहिले. **१९३० :-** आहारविषयक ग्रंथाचे लेखक गंगाधर बाळकृष्ण परांजपे यांचे निधन. 'आहारमीमांसा'तून आहारशास्त्राचे सविस्तर विवेचन तसेच 'रोग्याची शुश्रूषा', 'आरोग्यशास्त्र' असे ग्रंथ त्यांनी लिहिले. **१९३७ :-** साहित्यिक बाबूराव वरघंटे यांचा जन्म. यांच्या साहित्य संपदेत 'मुक्ती यज्ञ' हा कविता, गाणी, गजल यांचा संग्रह. 'जिवंत मरण' ही कादंबरी. 'हुंकार वेदना', 'आक्रोश ज्वाला' ह्या मराठी गजल तसेच इंग्रजीत गजल लिहिण्याचा अभिनव प्रयोग त्यांनी केला. **१९५७:-** लेखक, प्राध्यापक, उपप्राचार्य, अर्थतज्ज्ञ अरविंद नारायण केळकर यांचा जन्म ह्यांनी वाणिज्य शाखेतील म हाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विपूल प्रमाणात अर्थशास्त्राची पाठ्यपुस्तके लिहिली. त्यामध्ये अर्थशास्त्राची ओळख, बँकिंग, भारताचा आर्थिक इतिहास, भारतीय अर्थव्यवस्था, व्यावसायिक अर्थशास्त्र' आदी पुस्तकांचे सहलेखक म्हणून काम केले.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ सप्टेंबर

१) श्रीम. उषा श. पटवर्धन
अलिबाग, २४-९-१९४२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**निवेद माणिक मानाजी, अलिबाग**

**कै.अरविंद विठ्ठल कुंटे, २१ वा स्मृतिदिन, बाजार पेठ, अलिबाग**

# नागोठण्यात अवैध धंदे तेजीत

## ■ ६ वर्षात प्रशासनाने केली फक्त ७७ ठिकाणी कारवाई

**। नागोठणे । वार्ताहर ।**

**नागोठण्याजवळील ऐनघर विभागामधील सुकेळी परिसरातील जंगलात गावठी दारुची निर्मिती व गावठी दारुचे अवैध धंदे तेजीत सुरु आहेत. या गावठी दारूचा पुरवठा नागोठणे विभागातील मुरावाडी, वरवठणे, वेलशेत-आंबेघर, कडसुरे, पळस आदींसह सर्वच परिसरात दारुच्या पार्सल सेवेने होत असल्याने तेथेही गावठी दारुची विक्री होत असल्याचे खात्रीशीर वृत्त आहे. असे असतांनाही राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दारूबंदी खाते व स्थानिक पोलिसांचे या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून आश्चर्य व्यक्त करण्यात येत असून महिला वर्गातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.**



महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत नागोठणे विभागात २०१८ मध्ये ०९, २०१९ मध्ये १२, २०२० मध्ये ०६, २०२१ मध्ये ११, २०२२ मध्ये ३३ तर २०२३ मध्ये ०६ अशा एकूण ७६ केसेस करण्यात आल्याचे ॲड. महेश पवार यांनी दाखल केलेल्या माहितीच्या अधिकार अर्जाने उघड झाल्याने या केसेस फक्त सरकारला व वरिष्ठांना दाखविण्यासाठी केवळ दिखावा म्हणून करण्यात आल्यात का असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

नागोठणे परिसरातील गावठी दारु निर्मितीच्या अड्ड्यांवर पोलिसांकडून करण्यात येत असलेल्या कारवाईत केवळ नवसार मिश्रित बेवारस रसायन भरलेले ड्रम वगैरे माल नष्ट करण्यात येत आहे. मात्र सदर दारुनिर्मिती अड्डे चालविणारे पोलिसांच्या हाती लागत नसल्याने नागोठणे विभागात हे अवैध गावठी दारूचे अड्डे वारंवार बंद करूनही पुन्हा ते नव्या जोमाने सुरु होत आहेत. त्यामुळे या अवैध गावठी दारु अड्डेवाले व विक्रेत्यांना नक्की कुणाचा आशिर्वाद आहे. हे मात्र अद्यापही गुलदस्त्यातच आहे. त्यामुळेच दिवसाढवळ्या सुरु असलेल्या या अवैध गावठी दारु निर्मितीच्या अड्ड्यांवर व गावठी दारू धंद्यावर तसेच चोराटी व पार्सल पद्धतीने सुरु असलेल्या गावठी दारुच्या विक्रीवर राज्य उत्पादन शुल्क खाते व पोलिसांनी लवकरात लवकर तसेच ठोस कारवाई करुन गावठी दारुविक्री समूळ नष्ट करावी, अशी मागणी या विभागातील महिलावर्गांकडुन होत आहे.

या आधीही ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील खैरवाडी तसेच वाघ्रणवाडी जंगलातील गावठी दारुची निर्मिती करण्याच्या ठिकाणावर जाऊन ते अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले होते. असे असले तरी सद्य परिस्थितीत या विभागामध्ये गावठी दारुची विक्री तेजीत सुरू आहे. गावठी दारुची विक्री जोरदार सुरू झाल्यामुळे महिलांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.



# स्वच्छता विषयी पथनाट्य; वडगांव शाळेचा उपक्रम

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

स्वच्छता जेथे आरोग्य नांदे तेथे. या पंक्ती आपणास खूप काही सांगून जातात. आज जिकडे तिकडे स्वच्छतांचे तीनतेरा वाजले असतांना याचे महत्व पटवून देण्यासाठी रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव येथे पथनाट्य समवेत स्वच्छता रॅली, स्वच्छता प्रतिज्ञा, स्वच्छता गीत, गायन, पथनाट्य, व मानवी साखळी याद्वारे जनजागृती करण्यात आली.

स्वच्छतेचे किती महत्व असते यांचे आपणांस विविध ठिकाणी स्वच्छतेचे संदेश देणारे फलक आपण सातत्याने वाचत असतो. मात्र, ते एखाद्या पथनाट्य स्वरुपात दाखविले की, ते त्यांचे महत्त्व समजत असते. यावेळी कविता दहिफळे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.त्यांनी स्वच्छता किती महत्त्वाची आहे. हे पटवून देत असतानाच आपल्या आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी गायना सह तज्ज्ञांचे स्वच्छता विषयी व्याख्यान देवून विद्यार्थामध्ये सकारात्मक भुमिका निर्माण केली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, सर्व शिक्षक, स्वयंसेविका गाव स्वच्छता मोहीम राबविली. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या मार्गदर्शना खाली वैजनाथ जाधव, उपक्रमाचे प्रमुख मयुरी धायगुडे यांनी नियोजन करून घोषवाक्ये, गीत, नाट्यांचे आयोजन केले होते. तसेच गावातून रॅली काढून लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

## गाईचे वासरू चोरण्याचा प्रयत्न

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोरबे पुनर्वसन नानीवली गावा शेजारी ग्रुपग्रामपंचायत चौक यांचे डम्पिंग ग्राऊंड आहे. शुक्रवारी (दि.२०) सायंकाळी रिक्षा चालक दिनेश पाटील व सचिन कातकरी हे पनवेल तालुक्यातील असून यांनी मिळून नानिवली ठाकूर वाडीतील एका गरीब शेतकऱ्याचे लहान वासरू बळजबरीने रिक्षात अमानुष पद्धतीने कोंडून चोरून नेले. ही माहिती मिळताच स्थानिकांनी रिक्षाचा पाठलाग केला असता, आरोपी यांनी चोरलेले वासरू लोधीवली येथील रिलायन्स कॉलनी येथे सोडून पलायन केले. वासरूची किंमत अंदाजे ७ हजार रुपये असून दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माणगावात रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ■ १२५ रक्तबॅगा संकलित, उम्मत-ए मुस्लिम कमिटीचा उपक्रम

**। माणगाव । वार्ताहर ।**

प्रेषित मोहम्मद पैगंबर सर्वांसाठी, रक्तदान हे जीवनदान व सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो हि समाज सेवी भावना नजरेसमोर ठेऊन उम्मत-ए मुस्लिम कमिटी माणगाव यांच्यावतीने ईद-ए मिलाद-उन-नबी निमित्ताने शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने रविवार २२ सप्टेंबर २०२४ रोजी शासकीय विश्रामगृह माणगाव या ठिकाणी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान



शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभून शिबिरात १२५ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. आयोजकांना पहिल्याच वर्षी रक्तदान शिबिरास भरघोस प्रतिसाद मिळाला. अनेक मान्यवरांनी शिबिराला भेट देऊन भरभरून कौतुक केले. जिल्हा शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढीच्या रक्त संक्रमण अधिकारी डॉ.शितल स्वामी, ज्येष्ठ पत्रकार मजीद हाजीते, कम लाकर होवाळ, आजेश नाडकर, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र मोरे, सुमित काळे, अल्ताफदादा धनसे, राजू मोरे, मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते, बाजारटेप मोहल्ला उपाध्यक्ष गुलजार खान, सर्फराज अत्तार, एकता क्रिकेट असोसिएशनचे संस्थापक राहुल दसवते यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेटी देऊन आयोजकांचे कौतुक केले.

या शिबिराच्या सुरुवातीला मौलाना अमीर नदाफ यांनी कुराण पठन करून मुफ्ती मुझफ्फर सेन यांनी ईद ए मिलादचे महत्व आपल्या मार्गदर्शनात सांगितले. सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी वैभव कांबळे, रामेश्वर मुळे, गणेश सुतार, रिद्धी गुरव, नीलिमा जिरंगे, मनीषा नवाले, उमेश पाटील, रोहित सूर्यवंशी, उम्मत - ए. मुस्लिम कमिटी माणगावतर्फे मुफ्ती मुझफ्फर सेन, अकबर परदेशी, सिराज परदेशी, शादाब गैबी, बशीर करेल, सर्फराज अफवारे, सिराज अफवारे, फहद करबेळकर, शहानवाज अत्तार, नदीम परदेशी, इरफान हाजीते, सलमान कागदी, नदीम दुस्ते, मुन्नवर शेख, मन्सूर मुकादम, रिजवान मुकादम, रुमान जामदार यांच्यासह सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उम्मत ए मुस्लीम कमिटीतर्फे सुमय्या मल्लीचा सत्कार



**। माणगाव । वार्ताहर ।**

उम्मत ए मुस्लीमा कमिटीतर्फे रायगड पोलीस दलात भरती झाल्याबद्दल तालुक्यातील गोरेगाव येथील सुमय्या इब्राहिम मल्ली हिचा पालकांसमवेत माणगाव येथे रविवार २२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या ईद ए मिलाद निमित्त आयोजित कार्यक्रमात यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी माणगाव उम्मत ए मुस्लीमा कमिटीचे मुफ्ती मुझफ्फर सेन, अकबर परदेशी,सिराज परदेशी,शादाब गैबी ,बशीर करेल,अत्तार,नदीम परदेशी,इरफान हाजीते,रफिक जामदार, शाजान जळगावकर आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांनी माथेरान पर्यटनस्थळांकडे लक्ष द्यावे

**। माथेरान । वार्ताहर ।**

सन १८५० मध्ये ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांनी माथेरानचा शोध लावला त्यास जवळपास पावणेदोनशे वर्षे पूर्ण होत आहेत. तरीसुद्धा याठिकाणी अद्याप विकासाच्या पाऊलखुणा या भूमीत उमटल्या नाहीत. पर्यटन वाढीच्या दृष्टीने महत्त्वाची वाहतुकीची व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासन आणि आजवरचे संबंधीत सर्वच तालुक्यातील लोकप्रतिनिधी सुध्दा मतांच्या राजकारणापायी हे अपयशी ठरले आहेत. नेरळ ते माथेरान या एकमेव मार्गाशिवाय अन्य पर्यायी



व्यवस्था उपलब्ध झालेली नसल्याने इकडे पर्यटक येत नाहीत.त्यामुळेच इथलं पर्यटन अन्य स्थळांप्रमाणे बाराही महिने बहरत नाही. केवळ ठराविक सुट्ट्यांच्या भरवशावर इथला भूमिपुत्र आपल्या व्यवसायाची आर्थिक गणिते सोडविण्यासाठी तारेवरची कसरत करत आहे.

नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवजयंतीच्या दिवशी किल्ले शिवनेरी वर राज्यातील काही पर्यटनस्थळे विकसित करण्यात येणार असल्याचे आपल्या भाषणात म्हंटले आहे. त्याप्रमाणे त्यांनी रायगड जिल्ह्यातील या सुंदर स्थळाकडे सुध्दा जातीने लक्ष केंद्रित करून इथे पर्यायी सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे. दस्तुरी येथील वाहन कोंडी टाळण्यासाठी एम.पी. प्लॉट ९३ हा नगरपरिषदेकडे हस्तांतरण करण्यात यावा त्याचबरोबर पनवेल-धोदाणी मार्गे माथेरान हा प्रस्तावित फिनिक्युलर रेल्वे प्रकल्प सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

> **श्री मलंग गडाच्या धर्तीवर माथेरानचा प्रस्तावित फिनिकुलर रेल्वे हा प्रोजेक्ट शासनाने करायला पाहिजे. ज्यामूळे हजारो कुटूंबाला रोजगार निर्मिती होईल व माथेरानचे पर्यटन अधिक विकसित होईल.**
> **-शिवाजी शिंदे, माजी विरोधी पक्षनेते माथेरान**

# शेतीविषयक विविध कार्यक्रम संपन्न

**। खांब । वार्ताहर ।**

मौजे कळसांबडे येथे शेतकऱ्यांची सभेसह शेतीविषयक विविध प्रकारचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. मंडळ कृषी अधिकारी सारिका दिघे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, बांबू लागवड योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, यांत्रिकीकरण, पीएम किसान, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना आदी योजना बद्दल शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.



कृषि सहायक अतुल बाबर यांनी भात पिकावरील विविध कीड व रोग, नियंत्रण खत व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले तसेच भात पीक प्रात्यक्षिक प्लॉट शेतकऱ्यांसमवेत भेट देण्यात आली. ई-पीक पाहणी कशी करावी याबाबत माहिती सांगितली. तसेच शेतकरी राजेश मोरे यांनी त्यांचे शेती अनुभव याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. बैठकीच्या शेवटी सर्व शेतकऱ्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

## कुलस्वामीनीचे आगमन, तयारी झाली पूर्ण

**उरण :** शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत व आम्ही उलवेकर मित्र मंडळ तसेच आम्ही उलवेकर महिला मंडळ, महेश स्पोर्ट्स क्लब शेलघर यांच्या संयुक्तविद्यमाने यंदा उलवेमध्ये सर्वात मोठा नवरात्रौत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. त्या अनुषंगाने गुरुवार २ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ७:३० वाजता सद्गुरू स्वीट चौक, सेक्टर १७ ते स्व. जनार्दन घरत क्रिडांगण, प्लॉट नंबर ६८, सेक्टर १७ उलवे येथे महाआगमन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे या सोहळ्याची दखल मुंबईच्या मंडळाने देखील घेतली आहे. रायगड जिल्हातून उलवेच्या कुलस्वामिनी आणि आम्ही उलवे कर मित्र मंडळ हयांची देखल घेतली गेली आहे. यंदाचे नवरात्रौत्सवचे हे ७ वे वर्ष असून या नवरात्र उत्सव दरम्यान रील व्हिडिओ स्पर्धा, गरबा डान्स स्पर्धा, फेन्सी ड्रेस स्पर्धा आदी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी नवरात्रातील सर्व उपक्रमात सहभागी व्हावे तसेच देवीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

**। नागोठणे । वार्ताहर ।**

कोएसोच्या बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान स्वच्छेताही सेवा या मोहिमेंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून प्रा. तुलसीदास मोकल यांच्या हस्ते या मोहिमेची सुरूवात झाली.



या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची स्वयंसेवकांना माहिती दिली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वच्छता ही सेवा या विषयावरील पोस्टर प्रदर्शनचे अनावरण केले.एए या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दिनेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राबवले. या आठवड्यात दत्तक गावात स्वच्छता करण्यात येणार आहे. तसेच स्वच्छता ही सेवा या विषयावर पोस्टर प्रदर्शन आयोजित केले जाणार असल्याचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी सांगितले. या कार्यक्रमात एकुण ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोहर शिरसाठ यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वयंसेवक कु. साहिल घरत, कु. अभिजीत कुंभार, कु. राहुल कुमावत, कु. श्रावणी मरवडे, कु. कोमल म्हात्रे आदींसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

उरण : बदलापुर तालुक्यातील संतापजनक घटनेनंतर अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांमध्येही लैंगिक अत्याचारापासून संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी न्हावा-शेवापोलिसठाण्याच्यावतीने शनिवारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बदलापूर येथील घटनेनंतर न्हावा-शेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान व चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी जेएनपीएच्या कामगार वसाहतील मल्टीपर्पज हॉलमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये आरकेएफ स्कूलचा शिक्षकवर्ग व पाचवी ते दहावीचे सुमारे ८०० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

सीएफआयचे डॉ. किशोर देशमुख, ॲड. शैलेश कोंडुसकर, ॲड. विवेक गोपी यांनी यांनी चिल्ड्रन्स अवेअरनेसबाबत विद्यार्थी व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

# पनवेल शहर जिल्हा काँग्रेसची आढावा बैठक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने आगामी होऊ घातलेल्या महाराष्ट्रातील सार्वत्रिक निवडणूक संदर्भात १८८ पनवेल विधानसभा क्षेत्रातील आढावा घेण्यासाठी सोमवार २३ सप्टेंबर २०२४ रोजी काँग्रेस भवन पनवेल येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी बी. एम. संदीप यांच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीस पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, जेष्ठ नेते शशिकांत बांदोडकर, कार्याध्यक्ष, श्रुती म्हात्रे, नौफील सय्यद, मल्लिनाथ गायकवाड, शशिकला सिंग, जयश्री खटकाले, भारती जळगावकर, सुधीर मोरे, कांतीभाई गंगर, प्रीतेश साहू, लतीफ शेख, जोस जेम्स, राहुल जनारोकर तसेच जयेश लोखंडे, जयवंत देशमुख, राकेश चव्हाण, सागर पगारे, राहुल सावंत, सुरज नरुटे, सिमोन सातपुते, रमेश राव, राकेश जाधव, ताहीर खामकर, चेतन म्हात्रे, शाहीद मुल्ला यांच्यासह आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

## एक वर्षापासून वीज गायब; बोरगाव येथील प्रकार आला समोर

# विजेच्या पुरवठ्याअभावी अंगणवाडी केंद्र ओस

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायतीमधील बोरगाव येथील अंगणवाडी केंद्र येथील बालकांना आरोग्य सुविधा देण्यात अडचणीचे ठरत आहे. तेथे वीज पुरवठा खंडित झालेला असल्याने अनेक बालके केंद्रात येण्यास टाळाटाळ करताना दिसत आहेत. दरम्यान, एकात्मिक बालविकास विभागाने तालुक्यातील सर्व अंगणवाडी केंद्रात वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.**

कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या बोरगांव गावातील अंगणवाडी केंद्रावर सुविधाचा अभाव दिसून येत आहे. बोरगांव गावातील अंगणवाडी केंद्रात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील ३५-४० बालकांचा पट आहे. नियमितपणे बालके अंगणवाडी केंद्रावर पोषण आहारासाठी जास्त असतात. मात्र, या केंद्रावर मागील एक



वर्षांपासून विजेचे कनेक्शन तोडण्यात आले आहे. केंद्रात येणारी बालके ही वयाने लहान असल्याने त्यांना वीज आणि त्यानंतर पंख्यांची आवश्यकता असते. लहान बालकांना पंख्यांची सवय लागली असल्याने बोरगाव केंद्रात सुविधा मिळत नाही. यामुळे उन्हाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. बालकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. सप्टेंबर महिना अखेर आणि ऑक्टोबर येत असल्याने उन्हाचा उष्म्यामध्ये वाढ झाली आहे. पंख्यांची सुविधा नसल्याने या लहान बालकांना बसणे असह्य होत असल्याने बालके नियमितपणे येणे टाळत असल्याचे. परिणामी लहान बालकांना त्रास सहन करावा लागतो.

कर्जत तालुक्यातील अनेक अंगणवाडी केंद्रावर समस्याचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. वीज जोडणी तोडण्यात आलेली अनेक अंगणवाडी केंद्रं कर्जत तालुक्यात आहेत. त्याचा परिणाम बालकांची संख्या कमी होण्यावर देखील होताना दिसत असतो. प्रामुख्याने शाळेची सवय लागावी म्हणून आणि पोषण आहार घेण्यासाठी बालके येत असतात. हे लक्षात घेवून एकात्मिक बालविकास विभागाने आपल्या सर्व केंद्रात वीज जोडण्या पूर्ववत कराव्यात.

# परिवहन कर्मचाऱ्यांचे आंदोलन

## हाताला काळ्या फिती लावून कामाला सुरुवात

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
**नवी मुंबई महापालिका प्रशासनाकडून वारंवार लेखी पाठपुरावा करुन, शिष्टमंडळाच्या माध्यमातून पालिका आयुक्तांसह परिवहन व्यवस्थापकांच्या सतत भेटी घेऊनही समस्या सुटतच नसल्याने परिवहन विभागातील रोजंदारी तसेच ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.२३) सकाळपासून काळ्या फिती लावून कामाला सुरुवात केली.**




कामगार नेते रविंद्र सावंत यांच्या इंटक संलग्न महाराष्ट्र कर्मचारी युनियनच्या माध्यमातून परिवहन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत संताप व्यक्त केला आहे. महापालिकेच्या परिवहन विभागात काम करणाऱ्या रोजंदारी तसेच ठोक मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे निवारण करुन त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी महापालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनातून मागणी केली आहे. जर या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर सोमवारी काळ्या फिती लावून काम करणार व त्यानंतर कामबंद आंदोलन करणार असल्याचा इशारा रविंद्र सावंत यांनी महापालिका प्रशासनाला दिला होता.

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रमामध्ये रोजंदारी तसेच ठोक मानधनावर वाहक आणि चालक कार्यरत आहेत. प्रशासनामध्ये आज ना उद्या आपली सेवा कायम होईल या आशेवर हे कर्मचारी गेली १५ ते १६ वर्षे इमानेइतबारे काम करत आहेत. या कर्मचाऱ्यांची सेवा तर कायम झाली नाहीच, पण त्यांना पगारवाढही प्रशासनाने दिलेली नाही. त्यांच्या समस्यांचे निवारण होत नाही, त्यांना माफक प्रमाणावर सुविधा उपलब्ध करुन देण्यासही प्रशासनाने आजवर टाळाटाळच केली आहे. जे प्रशासनाच्या प्रवासी सेवेचा डोलारा सांभाळतात, त्यांच्यासाठी तरतूद करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आणि प्रशासन या जबाबदारीपासून आपले अंग झटकू शकत नाही. स्वमालकीचे धरण व राज्यातील श्रीमंत महापालिकांमध्ये गणना होणाऱ्या नवी मुंबई महापालिका प्रशासनासाठी ही भूषणावह बाब नाही. परिवहन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना न्याय मिळण्यासाठी व त्यांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी कामगार नेते रविंद्र सावंत सातत्याने महापालिका आयुक्त व परिवहन व्यवस्थापकांकडे लेखी पाठपुरावा करत आहेत.

## पनवेलमध्ये मंगेश परुळेकरांचा गौरव

**। पनवेल । वार्ताहर ।**
पनवेलचे उद्योजक मंगेश परुळेकर यांना गोवा येथे झालेल्या सारस्वत चेंबर्स कार्यक्रमात सारस्वत रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सारस्वत रत्न हा पुरस्कार पनवेल मधील ओरायन मॉल व ऐंपी बिल्डर्सचे मालक मंगेश परुळेकर यांना प्रदान करण्यात आला. गोवा येथील सिन्नपूरुष हॉल येथे हा पुरस्कार सोहळा पार पडला. गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत व डेंन्पो यांच्या हस्ते हा पुरस्कार मंगेश परुळेकर यांना प्रदान करण्यात आला. मंगेश परुळेकरांनी अनेक समाजऊपयोगी कामे केली आहेत. त्यामध्ये बापदेव वाडी गाढेश्वर येथे आदिवासी पाड्यावर तसेच खांदा कॉलनीतील अनाथ आश्रमात शिधा वाटप, पंखे वाटप व सहभोजन दिले आहे. याचबरबर त्यांनी ओरायन मॉल येथे रक्तदाना शिबीर देखील भरवले होते. यात विक्रमी १६६ बाटल्या रक्त संकलन केले होते.



## जासईत कर्मवीर जयंती साजरी

**। उरण । प्रतिनिधी ।**
उरणमधील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयात संस्थेचे संस्थापक डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती रविवारी (दि.२२) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या महापुरुषांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, विद्यालयाचे अध्यक्ष अरुण जगे यांच्या हस्ते कर्मवीरांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. पालखी मिरवणुक विद्यालयाचे लेझीम पथक, ढोल ताशा, बँड पथक आणि कर्मवीरांच्या जयघोषाने संपूर्ण जासई गावातून फिरविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थांनी कर्मवीरांच्या पालखीचे पूजन केले. या पालखी मिरवणूक सोहळ्यासाठी विद्यालयाचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष डी.आर.ठाकूर, नरेश घरत, रघुनाथ ठाकूर, सुभाष घरत, यशवंत घरत, रजनी घरत, रमेश पाटील, नुरा शेख, टी.टी. घरत आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेल तालुक्यातील खांदा वसाहत परिसरात मोठ्या प्रमाणावर पार्किंगची समस्या भेडसावत आहे. सेक्टर-६ मधील आसूड गाव येथे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा मोठे ट्रक पार्किंग करून ठेवलेले असतात. तसेच, आगरी शाळेच्या बाजूला असलेल्या जागेत सुद्धा मोठ्या प्रमाणावर पार्किंग होत आहे. याच रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर शाळकरी मुले ये-जा करीत असतात. यावर वाहतूक प्रशासनाने लक्ष देणे महत्वाचे आहे.

## वाहनांची ओळख पटविण्याचे आवाहन

**पनवेल :** विविध गुन्ह्यातील जप्त तसेच बेवारस वाहनांची ओळख पटविण्याचे आवाहन पनवेल तालुका पोलिसांनी केले आहे. गुन्ह्यातील जप्त व बेवारस १२ दुचाकी व ८ चार चाकी अशी एकूण २० वाहने बऱ्याच कालावधीपासून पोलीस ठाण्याच्या आवारात तसेच ईएमसी तळोजा येथील वाहनतळ येथे जमा आहेत. ही वाहने गुन्ह्यातील, अपघातातील व बेवारस पडून आहेत. यामुळे आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी या वाहनांची ओळख पटवावी.

## अलिबागमध्ये महिला संरक्षण कार्यक्रम संपन्न

**। अलिबाग । वार्ताहर ।**
अंतर्गत तक्रार निवारण कमिटी, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग तसेच महिला सक्षमीकरण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुक्यातील चोंढी-किहीम येथील लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या वरिष्ठ महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२०) महिला सुरक्षितता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमात ॲड. निहा राऊत तसेच तपस्वी गोंधळी यांची व्याख्यात्या म्हणून प्रमुख उपस्थिती लाभली होती.



कार्यक्रमात ॲड. निहा राऊत तसेच प्रशिक्षणार्थी म्हणून तपस्वी गोंधळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ॲड. निहा राऊत यांनी मुलींना आपले राहणीमान कसे असावे, सोशल मीडियाचा अतिवापर कसा धोकादायक आहे, हे उत्तमरीत्या समजावून सांगितले. तसेच, एखादा अनैतिक प्रसंग ओढावल्यास कसे स्वसंरक्षण करावे याचे उत्तम मार्गदर्शन केले. कायद्यामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी कोणते कायदे करण्यात आले आहेत, आपण त्या सुविधांचा उपयोग कशाप्रकारे करू शकतो याचे मार्गदर्शन देखील केले. पुढे तपस्वी गोंधळी यांनी मुलींना स्वसंरक्षण कसे करावे, याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. स्वसंरक्षण ही काळाची गरज आहे, आपण सतर्क राहणे कसे गरजेचे आहे, याचे उत्तम मार्गदर्शन त्यांनी केले.

हा कार्यक्रम राबविण्यासाठी लिना पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन अंतर्गत तक्रार निवारण कमिटी समन्वयक हर्षदा पुनकर, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग समन्वयक प्रितीजा राऊळ तसेच महिला सक्षमीकरण कक्ष समन्वयक राजश्री कदम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थिनी विनश्री भगत हिने केले.

## प्रदिप पवार पुरस्काराने सन्मानित



**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुंबईतील नरिमन पाईंट येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार' या विशेष सोहळ्याचे आयोजन अफ्टरनून व्हॉईस व रेड अँट ब्रँड प्रमोशन यांच्याकडून करण्यात आले होते. या सोहळ्यात पोलादपूरच्या रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा धारवलीचे मुख्याध्यापक प्रदिप पवार यांना सामाजिक व शैक्षणिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर व सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमात विधितज्ञ ॲड. उज्वल निकम, गहिनीनाथ औसेकर, डॉ. वैदेहि तामन, फौंडर ॲन्ड चीफ ऑफ आफ्टरनून व्हॉईस व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थितीत होते.

## कार्यालयाच्या परिसराची स्वच्छता

**महाड :** स्वच्छ भारत मिशनला दहा वर्ष होत असल्याने शासनाकडून विविध कार्यालयांच्या परिसराची स्वच्छता केली जात आहे. महाड उपविभागीय कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून परिसराची स्वच्छता करण्यात आली. १४ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीमध्ये 'स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता' असा कार्यक्रम राबवला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत लोकसहभागातून ग्रामीण भागात तसेच जलकुंभ, शासकीय कार्यालय, रेल्वे-बस स्थानक व रस्ते स्वच्छ करण्यावर भर देण्यात येणार आहे.

## राजेंद्र भगत यांचा सन्मान

**। उरण । वार्ताहर ।**
नवी मुंबई परिसरातील सामाजिक कार्यकर्ते तेजस डाकी यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या युवकांचा, जेष्ठ नागरीक तथा महिला भगिनींचा सन्मान करण्याचा व्रत आपल्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अंगीकारला आहे.

चिरनेर गावातील सुपुत्र तथा उरण, नवीमुंबई परिसरातील उत्स्फूर्त समालोचक राजेंद्र भगत यांच्या सामाजिक, निस्वार्थी कार्याची दखल सामाजिक कार्यकर्ते तेजस डाकी यांनी घेऊन गौरा



उत्सवाचे औचित्य साधून तथा राजेंद्र भगत यांच्या वाढदिवसानिमित्त घड्याळ भेट देऊन त्यांना सन्मानित केले आहे. यावेळी नवीमुंबई येथील मुर्तीकार संतोष चौलकर, मनोहर म्हात्रे, जगन्नाथ भगत, रविंद्र भगत, जीवन नारंगीकरांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**रसायनी :** चाणजे ग्राम पंचायत हद्दीतील शक्करपीर येथे शिवसेना ठाकरे गटाच्या नवीन शाखेचे उद्‍घाटन माजी आ. मनोहर भोईर, नरेश रहाळकर, संतोष ठाकूर व गणेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मनोहर भोईर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. तसेच, नवीन स्थापन झालेल्या शिवसेना शक्करपीर शाखेच्या शाखाप्रमुखपदी अश्फाक शेख व उप शाखाप्रमुखपदी इर्शाद मेमन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




## श्रीवर्धनला रंगले कविसंमेलन

**। श्रीवर्धन । वर्ताहर ।**
कोकण मराठी साहित्य परिषदेच्या श्रीवर्धन शाखेने रविवारी (दि.२२) रायगड जिल्हा कविसंमेलन आणि गझल मुशायरा या साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन पळधे केटरर्स यांच्या मंडपात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या संख्येने कवि उपस्थित होते. यात प्रामुख्याने कोमसाप रायगडचे अध्यक्ष सुधीर शेठ, समन्वयक अ.वि. जंगम, संजय गुंजाळ आदींचा समावेश होता. यावेळी श्रीवर्धन शाखेच्या अध्यक्षा सीमा रिसबूड, अनिता कांबळे, सुधीर शेठ, अ.वि. जंगम, वाचनालयाचे अध्यक्ष मनोज गोगटे यांनी मनोगत व्यक्त केली. हा कार्यक्रम कवी संमेलन व गझल मुशायरा अशा दोन भागांत रंगला. कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक संजय गुंजाळ होते. कवी संमेलनात सर्वश्री गंगाधर साळवी, डॉ. शीतल मालुसरे, दिपक सकपाळ, श्रेयस रोडे, नागेश नायडू, वैशाली साळुंके, नेहा प्रधान, ऋद्धी भगत, निकिता भोसले, छाया गोवारी व नायब तहसिलदार भुर्के, भक्ती केळस्कर, आर्या कोसबे, मनोज गुरव, शुभम वाणी, सीमा रिसबूड, अनिता कांबळे, शर्मिला जोशी यांनी स्वरचित काव्य रचना सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश नायडू यांनी केले.

## सीताराम येचुरी यांना आदरांजली

**। उरण । वार्ताहर ।**
मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय महासचिव व पक्षाचे सर्वोच्च नेते कॉम्रेड सीताराम येचुरी यांना रविवारी (दि.२२) महाविकास आघाडीच्यावतीने आदरांजली वाहण्यात आली. उरणच्या आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके सभागृहात सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सीताराम येचुरी यांनी उरण आणि रायगडातील शेतकरी व जनतेसाठी




केलेल्या कार्याबद्दल सभेत कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे रायगड जिल्हा सचिव कॉ. रामचंद्र म्हात्रे हे होते. यावेळी माजी आ. मनोहर भोईर, शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा खजिनदार प्रितम म्हात्रे, कामगार नेते कॉ. भूषण पाटील, काँग्रेस तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, जनवादी महिला संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष हेमलता पाटील, उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील, मधुसूदन म्हात्रे, काका पाटील, सत्यवान ठाकूर, प्रवीण पुरो, संतोष पवार यांनी आदरांजली वाहिली.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- **घरात घरकाम व मुलाची देखभाल** करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- **घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे.** ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४
- **कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि. फीडमिल प्लान्ट** EICHER करीता TRANS परवानाधारक वाहनचालक पाहिजेत पगार १३०००/-+ भत्ता २००/५००/९०० TRIP नुसार संपर्क : HR अनुष्का राऊत - ७७९८८८३८६४
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत.** ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- **वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे.** संपर्क-९७६२७७७९७५.
- **नांदगाव-मुरूड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट** भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९७६९४७४०६३
- **काशिद बीच येथील गेस्ट हाऊस भाडेतत्वावर** चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९५२७०६२४०८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### बागेत गाय, वासरू, फ्लेमिंगोचे पुतळे

## फुले महाविद्यालयाच्या सौंदर्यात भर

**। उरण । प्रतिनिधी ।**
**सामाजिक क्षेत्रात आपल्या चौफेर गुणांनी अनेक समाजपयोगी कार्य करणारे केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानाबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातील कार्य देखील प्रशंसनीय आहे. त्यांनी वाडी-वस्तीवरील आदिवासी मुलांच्या शिक्षणाकरिता लागणारे शैक्षणिक साहित्य व कपडे वाटप केले आहेत.**



तसेच, त्यांनी दत्तक घेतलेल्या ४६ आदिवासी मुलांच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च अशी अनेक प्रकारची कार्य केली आहेत. अशातच पुन्हा एकदा राजू मुंबईकर यांच्या प्रयत्नातून पनवेलमधील महात्मा फुले महाविद्यालयात खास मुलींकरिता बनविण्यात आलेल्या बागेत गाय, वासरू या प्राण्यांचे आणि फ्लेमिंगो या पक्षाचे पुतळे बसविण्यात आले आहेत.

निसर्गाच्या कुशीत वसलेले रयत शिक्षण संस्थेचे पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम साकारले गेले. यामध्ये वृक्षारोपण, सापांबद्दल असणारे समज आणि गैरसमज या विषयांवर विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनात्मक व्याख्यान अश्या कार्यक्रमांच्या माध्यमातून या महाविद्यालयासोबत त्यांचे नाते जोडले गेले आहे. अनेक यशस्वी, कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या महात्मा फुले महाविद्यालयाच्या बागेत प्राणी व पक्षांचे पुतळे बसवून या निसर्गरम्य कॉलेजच्या सौंदर्यात आणखीनच भर पडली आहे. यामुळे महात्मा फुले महाविद्यालयाचे रूप आणखीनच उठून दिसेल एवढं मात्र नक्की.

राजू मुंबईकर यांच्या औदार्यातून साकारलेल्या या कार्यक्रमाकरिता प्राचार्य गणेश ठाकूर, राजू मुंबईकर, पुष्पलता मढवी, जयश्री ठाकूर, आशा मेणकर, डॉ. अंजलीजी टकले, संगिता ठाकूर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर आणि सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी वर्ग उपस्थितीत होता.

## सजावट स्पर्धेत चोगले प्रथम

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**
तालुक्यातील मजगावच्या शिवप्रेमी शिवभक्त मित्र मंडळ आयोजित पर्यावरण पूरक इको फ्रेंडली गणपती बाप्पा सजावट आरास स्पर्धेत मजगावच्या हर्षद चोगले यांच्या पुरातन दगडी मंदिर या देखाव्याला प्रथम क्रमांक मिळाला आहे. द्वितीय क्रमांक तन्वी म्हाप्रळकर-कोकणी पद्धतीतील मंदिराच्या दर्शनी भागातील दिप सजावट, तर तृतिय क्रमांक कुणाल गाणार यांच्या करवीर महालक्ष्मी मंदिराला मिळाला. या स्पर्धेत उत्तेजनार्थ चिराग तेलगे, मिथुन भोईर, अनुज तांबडकर, वेदांत तळेकर, विनित घरत, सनिकेत बुल्लु, श्रावणी चौलकर, गणेश शेडगे, ओमकार गायकर, ऋतिक चोरढेकर, संदेश भोईर, निनाद तळेकर, श्रवण गिरणेकर व विराज घाटकर यांना बक्षिसे देण्यात आली.

# हुतात्म्यांना देणार मानवंदना

। पेण । वार्ताहर ।

चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृतिदिन २५ सप्टेंबर हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी १९९७ साली अनामिक आदिवासी हुतात्म्या नाग्या महादू कातकरी याला सर्वप्रथम पेण येथे कातकरी आदिवासींनी मानवंदना दिली होती. गेल्या २७ वर्षांपासून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यात आदिवासींनी अस्मितेची चळवळ सुरू केली. या चळवळीने हुतात्म्या नाग्या महादू कातकरी यांचे नाव केवळ स्तंभावरच कोरले नाहीतर आदिवासींच्या न्याय्य हक्कासाठी ठिकठिकाणी मंच सुरू केले.



अंकुर ट्रस्ट व लोक मंच या संघटनेमार्फत बुधवार, दि. २५ सप्टेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती पेण येथून हुतात्म्या प्रतिमेची मिरवणूक निघणार असून, या मिरवणुकीची सांगता महात्मा गांधी मंदिर पेण येथे होणार आहे. या कार्यक्रमास मानवी हक्क आयोगाचे सचिव नितीन पाटील, जिल्हाधिकारी रायगड किसन जावळे, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी आदिवासी आपल्या प्रश्नांची मांडणी करणार असून, आपल्या संविधानिक हक्कांबाबत कृती आराखडा तयार करण्यास येणार असल्याची माहिती संजय नाईक यांनी दिली.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती, विद्यमान मिळकत मालक मेहेरझाद डेव्हपर्स एल एल पी यांचेकडून त्यांचे खालील वर्णनाची मिळकत रजिस्टर दस्ताऐवजाने विकत घेण्याची ठरवली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. सोगाव, ता. अलिबाग, जिल्हा - रायगड**

| गावाचे नाव व तालुका | स. नं./गट क्र. | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| मौजे. सोगाव ता. अलिबाग | गट क्र. ३७/२/१ | ०-४३-४ हे आर या बिनशेती मिळकतीतील भूखंड क्र. २,३,४ व ६ |

सदरच्या मिळकती ह्या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदर मिळकती मधील बांधकामासह, लहान-मोठी झाडे, अंर्तभूत हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलास विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत इतर कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, गहाण, कुळवहीवाट, दान, बक्षिसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट किंवा मिळकतीतून येण्याजाण्याचा मार्ग वगैरे तसेच होणाऱ्या व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत, दावा, तक्रार अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्या सह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाण नाही व आमच्या अशिलास नंतर ही मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल.

कळावे....

दि. /०९/२०२४

अशिलातर्फे ॲडव्होकेट
**(ॲड. श्वेता अमित नारे)**
गंगासागर बिल्डिंग, बी विंग,
पहिला मजला, घुमकरवाडी जवळ,
कलेक्टर ऑफिस रोड, अलिबाग. ४०२-२०१
मो. नं. ९५२७११८८००

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती छाया विकास म्हात्रे, मानसी विकास म्हात्रे, राज विकास म्हात्रे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित जिरायत जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड | १३९४ | जि. ०-४८-८० | ३.३९ |
| | | एकूण ०-४८-८० | |

अलिबाग
दि. २३/०९/२०२४

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
**MAHESH S. MHATRE**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk.
Near Gawade Optics,
Alibag Raigad

## :: जाहीर नोटीस ::

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

| अ. क्र. | गांव | गट क्रमांक | एकुण | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | गोळेगणी, ता. पोलादपुर | २७९ | १-६१-०० | ०-६१ |
| २. | गोळेगणी, ता. पोलादपुर | २९२ | ०-२६-०० | ०-०६ |
| ३. | गोळेगणी, ता. पोलादपुर | २९९ | १-८३-०० | ०-५३ |
| ८. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३०१ | ०-२५-०० | ०-११ |
| ५. | गोळेगणी ता. पोलादपुर | ३०४ | ०-६९-०० | ०-१२ |
| ६. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३१३ | १-५८-०० | ०-४४ |
| ७. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३१८ | ०-२७-०० | ०-१२ |
| ८. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३१६ | ०-१५-०० | ०-०६ |
| ९. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३४३ | ०-५१-०० | ०-०९ |
| १०. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३५० | १-१३-०० | ०-२६ |
| ११. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३९५ | ०-६१-०० | ०-१२ |
| १२. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ३९७ | ०-३६-०० | ०-०६ |
| १३. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ४०६ | ०-२४-०० | ०-०६ |
| १४. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ४०९ | ०-५३-०० | ०-१२ |
| १५. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ४१३ | १-४१-०० | ०-४८ |
| १६. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ४२३ | २-३०-०० | ०-६२ |
| १७. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ४६७ | १-३७-०० | ०-५० |
| १८. | गोळेगणी, ता. पोलादपुर | ४६९ | ०-६३-०० | ०-१२ |
| १९. | गोळेगणी, ता. पोलादपुर | २६१ | ०-११-०० | ०-०३ |
| २०. | गोळेगणी, ता. पोलादपुर | २४३ | ०-९४-०० | ०-१९ |

वरील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक निता अनिल भरडा यांचेकडुन आमचे अशिल यांनी रजिस्टर्ड खरेदीखताने कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविलेल्या आहेत.

या मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतींच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतींमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतींबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत सकृतदर्शनी लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावुन येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ॲड. अन्वर ए. हुसेन**
बी.ए.,एल.एल.बी.
रा. मु. दत्तवाडी, मुरुड एस.टी. डेपो जवळ,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड,
पिन नं. ४०२४०१.
मो. ९४२३८२२७९०

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज ४८/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. कृष्णा गोपाळ म्हात्रे — अर्जदार
मु. पाल्हे, ता. अलिबाग
जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत नागाव, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१.अर्जदार हे मौजे पाल्हे, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आईचे कै. चंद्रभागा गोपाळ म्हात्रे यांना मृत्यु दि २१/८/१९८० रोजी मौजे पाल्हे येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत नागाव येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत नागाव यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२३/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २३/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २३/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांची खालील वर्णनाच्या मिळकती सर्व हक्कांगासह विकत घेण्याबाबत मिळकतींच्या विद्यमान मालकांसोबत बोलणी सुरू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) टेकाळी ता. अलिबाग | १२३ | ०-१४-६० पो.ख.०-०१-८० एकुण ०-१६-४० | ३.८१ | धाऊ गंगाराम लांबोर |
| २) टेकाळी ता. अलिबाग | २१६ | ०-३०-७० पो.ख.०-०४-६० एकुण ०-३५-३० | ५.१७ | धाऊ गंगाराम लांबोर |
| ३) टेकाळी, ता. अलिबाग | १५९ | ०-२१-६० पो.ख.०-०२-५० एकुण ०-२४-१० | ५.५६ | धाऊ गंगाराम लांबोर |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख २३/०९/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ४३/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. जयेंद्र दत्तात्रेय (दत्ताराम) पाटील
रा. मु. नवेनगर, कुरुळ — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत कुरुळ,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार यांचे वडील कै. दत्तात्रेय (दत्ताराम) तात्या (तातू) पाटील हे मौजे नवेनगर, कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी होते. अर्जदार यांचे वडील कै. दत्तात्रेय (दत्ताराम) तात्या (तातू) पाटील यांना मृत्यु दि २८/४/१९८२ रोजी नवेनगर, कुरुळ येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कुरुळ येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत कुरुळ यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि. २३/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २३/०९/२०१४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण: अलिबाग
तारीख :२३/९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

दिनांक : २४ सप्टेंबर २०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून श्रुती पियुष जैन यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट -**
**मौजे - सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| भरत महादेव जाधव | ६ | १३ | ०-७२-०० | ० | ४२ |
| | ६ | १४ | ०-२०-०० | ० | १२ |
| | ६ | १७ | ०-३६-०० | ० | १६ |
| | ६ | १९ | ०-२८-०० | ० | १४ |
| | ६ | २ | १-५८-०० | ० | ८४ |
| | ६ | २० | ०-५१-०० | ० | २२ |
| | ६ | २१ | ०-०३-०० | ० | ०३ |
| | ६ | २२ | ०-०५-०० | ० | ०३ |
| | ६ | २३ | ०-३८-०० | ० | ३४ |
| | ६ | २४ | ०-१५-०० | ० | ०९ |
| | ६ | ८ | ०-५९-०० | ० | १४ |
| | ७ | १ | ०-४०-०० | ० | ०३ |
| | ७ | ४ | ०-४९-०० | ० | १६ |
| | ७ | ८ | ०-३०-०० | ० | १७ |

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २४/०९/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

कार्यालयीन पत्ताः मु. पो. कशेळे,
कर्जत मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज १७/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
सौ. जयमाला रमेश कोळी
रा. साईबाबा मंदिराजवळ बोडणी — अर्जदार
पो. सारळ
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत कोप्रोली, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे बोडणी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे सासरे कै.हिरा सोमा कोळी यांचा मृत्यु दि ०२/९/२०१२ रोजी मौजे बोडणी येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कोप्रोली येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत कोप्रोली यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २३/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २३/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २३/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे कुंभारघर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे कुंभारघर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| श्रीमती. प्रणिता प्रविण गायकर, श्री. प्रविण जगन्नाथ गायकर | १७ | १ | ०-२६-०० | ३-३७ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक :- २३/०९/२०२४

सही /
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२/८२३७१५६४६९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक श्री.सुधाकर महादू पाटील यांच्या मालकी हक्कातील, ताबे कब्जातील व वहीवाटीतील मौजे करवले बुद्रुक (५५३३५७), ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या विक्री करण्यात येणाऱ्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणेः

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**करवले बुद्रुक (५५३३५७), ता. पनवेल, जि. रायगड**

| भुधारणा पद्धती | सर्व्हे/गट/हिस्सा/ उपविभाग कमांक | क्षेत्रफळ (हे.आर. प्रति) लागवडी योग्य | पोटखराबा | एकूण |
|---|---|---|---|---|
| भोगवटादार वर्ग-२ | ८७/४ | ०-३३-९० | ०-०२-०० | ०-३५-९० संपूर्ण क्षेत्रफळापैकी त्यांचा हिस्सा ०-३०-९० क्षेत्रफळापैकी विक्री योग्य क्षेत्र ०-१८-०० सदर जमिनमिळकत ही सर्व्हे/हिस्सा नं.८७/१/क हया मिळकतीला लागून असणारी मिळकत विक्री करण्याचे ठरले आहे |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौता ज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गडाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदर जमिन मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

**सही : वकील अजीत व्ही. सिंह**
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ताः १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता.आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२- ४००२ ६१४२
ई मेल - ajeet_advocate@yahoo.co.in


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची बिनशेती मिळकत हि जमीन मालक यांनी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकती संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांची खातरजमा करण्याकरीता जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग | १७७/४/१५ जुना सर्व्हे नं. १७७/ब पैकी प्लॉट नं. १५ | ३.५४.०० | ३५.४० |

वर वर्णन जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

तरी वर नमुद बिनशेती मिळकतीवर अन्य कोणाही इसमांचा संस्थांचा खरेदीखत, साठेकरार, कुळवहिवाटी, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणात्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत हि निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे असे समजून मालकी हक्काबाबत दाखला प्रदान करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - २३/०९/२०२४
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. बुरूमखाण पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड,

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली अविभक्त हिश्श्याची जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीच्या विद्यमान मालकांपैकी १) श्री. रमण रघुनाथ पाथरे, २) सौ. योगिता यशवंत साडविलकर व ३) श्री. अक्षय रविंद्र पाथरे यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा संबंधित विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| रांजणपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड. | ४/१ | ०-५४-३० पैकी ०-३६-४५ | ०.५० |

अलिबाग,
दिनांक : २४/०९/२०२४

**राजेंद्र दा. पाटील,**
**ॲडव्होकेट**
कृष्णवंदन -२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९८२२५२८९३१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक श्री. ज्ञानदेव नारायण भोईर यांचा मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील मौजे करवले बुद्रुक (५५३३५७), ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या विक्री करण्यात येणाऱ्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणेः

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**करवले बुद्रुक (५५३३५७), ता. पनवेल, जि. रायगड**

| भुधारणा पध्दती | सर्व्हे/गट/हिस्सा/ उपविभाग कमांक | क्षेत्रफळ (हे.आर. प्रति) लागवडी योग्य | पोटखराबा | एकूण |
|---|---|---|---|---|
| भोगवटादार वर्ग-१ | ८७/१/क | ०-४२-०० | ०-०२-६० | ०-४४-६० संपूर्ण क्षेत्रफळापैकी शिक्षणसंस्थेच्या कामासाठी विक्री योग्य क्षेत्र ०-३०-०० |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौताज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तीला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवश्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदर जमिन मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही : वकील अजीत व्ही. सिंह
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ताः १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता.आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-४००२ ६१४२
ई मेल - ajeet_advocate@yahoo.co.in

**निवडक**

### तंदुरुस्ती, लय महत्वाची

**नवी दिल्ली :** वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा आणि धडाकेबाज यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतची तंदुरुस्ती व लय आगामी बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिकेत भारतासाठी निर्णायक ठरेल, असे मत ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार इयन चॅपल यांनी व्यक्त केले. भारताने यापूर्वी ऑस्ट्रेलियातील लागोपाठ दोन मालिका जिंकल्या आहेत. ऑस्ट्रेलियातील मालिका विजयाची हॅटट्रिक साधण्यासाठीत्यांनी तंदुरुस्त राहणे गरजेचे आहे.

### ऋषभ सरस आहे का

**नवी दिल्ली :** कार्तिकने धोनीच्या यष्टिरक्षक म्हणून कारकिर्दीवर प्रकाश टाकला आणि कर्णधार म्हणून माहीच्या कामगिरीमुळे तो ऋषभ पंतपेक्षा अधिक सरसर असल्याचे निदर्शनास आणले. तो म्हणाला, 'यष्टीरक्षक म्हणूनही धोनीच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करू नका. त्याने तर गरज असेल तेव्हा धावा पण केल्यात. त्याचबरोबर भारताला जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या जेतेपदापर्यंत नेले. भारत त्याच्या नेतृत्वात कसोटी क्रमवारीत बराच काळ पहिल्या क्रमांकावर होता.

### रोहितने साधला संवाद

**मुंबई :** बांगलादेशबरोबर सामना संपल्यानंतर अश्विनला त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. यादरम्यान रोहित त्याच्या सहकाऱ्यांच्या कुटुंबियांसोबत बोलताना दिसला. रोहित शर्माने अश्विनच्या मुली अकिरा आणि आध्या या दोघींशी खास संवाद साधला. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित अनेकदा असे करताना दिसतो आणि चाहत्यांना त्याचा हा स्वभाव खूप आवडतो.

### पाकची नवी रणनीती

**लाहोर :** सततच्या पराभवांमुळे त्रस्त झालेल्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने नवी रणनीती आखली आहे. बाबर आझम आणि कर्णधार शान मसूदसह इतर खेळाडूंनी रविवारी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आयोजित केलेल्या एक दिवसीय वर्कशॉपला हजेरी लावली. यामाध्यमातून पाकिस्तान क्रिकेटच्या भविष्यातील योजनांबद्दल चर्चा करण्यात आली. लाहोरमध्ये हा कॅम्प पार पडला. यामध्ये फखर झमान, मोहम्मद रिझवान, सैय अयुब, सलमान अली अन्य खेळाडू होते.

### स्वत:लाच केलं बाद

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज लुंगी एनगिडीने फुल लेन्थ बॉल टाकला, ज्यावर अफगाणिस्कानचा खेळाडू रहमतुल्ला गुरबाजने गोलंदाजाच्या दिशेने शॉट खेळला. एनगिडीने चपळाई दाखवत चेंडू पकडण्याचा प्रयत्न केला. एनिगिडीनेच्या हातावर चेंडू आदळल्यानंतर क्रीजबाहेर धावायला तयार असलेला रहमत शाहच्या खांद्यावर जाऊन आपटला. तिथून चेंडू थेट स्टंपवर जाऊन आदळला. लुंगी एनगिडीने सेलिब्रेशन केले.

## चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताने रचला इतिहास

# महिला-पुरुषांच्या टीमला सुवर्णपदक



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने रविवारी इतिहास रचला आहे. बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेमध्ये (२०२४) भारताने प्रथमच सुवर्णपदक जिंकलं आहे. भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या अंतिम फेरीत प्रथमच सुवर्णपदक पटकावलं आहे.

हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे ४५ वे बुद्धिबळ ऑलिम्पियाड आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पुरुष गटात १९५ देशांतील १९७ संघ आणि महिला गटात १८१ देशांतील १८३ संघ सहभागी झाले होते. ग्रँडमास्टर डी गुकेश, अर्जुन इरिगेसी आणि आर प्रग्नानंद यांनी स्लोव्हेनियाविरुद्ध ११ व्या फेरीत सामने जिंकले. जागतिक चॅम्पियनशिपचे आव्हानवीर गुकेश आणि अर्जुन एरिगेसी यांनी पुन्हा एकदा महत्त्वाच्या सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करून भारताला खुल्या गटात पहिलं विजेतेपद पटकावण्यास मदत केली. भारतीय महिलांनी अझरबैजानचा ३.५-०.५ असा पराभव करून देशासाठी सुवर्णपदक जिंकले. डी हरिकाने पहिल्या बोर्डावर तांत्रिक श्रेष्ठता दाखवली आणि दिव्या देशमुखने पुन्हा एकदा तिच्या प्रतिस्पर्ध्याला पराभूत करून तिसऱ्या बोर्डावर वैयक्तिक सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले.

भारतीय महिला संघाने २०२२ मध्ये चेन्नई येथे कांस्यपदक जिंकले होते. डी गुकेशने बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये दुसरे वैयक्तिक सुवर्णपदक जिंकून नवा इतिहास लिहिला आहे. गुकेशने पुरुष विभागात भारताला त्यांच्या पहिल्या-वहिल्या ऑलिम्पियाड विजयाचे नेतृत्व केले. कारण तो स्पर्धेत अपराजित राहिला. गुकेशने त्याच्या १० सामन्यांपैकी ९ सामन्यांमध्ये विजय मिळवला आणि एक सामना अनिर्णित राहिला. त्याच्या व्यतिरिक्त भारताच्या अर्जुन एरिगाईसीला ११ सामन्यांपैकी १० विजयांसह सर्वोत्तम कामगिरी करणारा खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. या जोडीने भारताला स्पर्धेत २२ पैकी २१ संभाव्य गुण मिळवून देत देशासाठी इतिहास रचण्यात मदत केली.

पुरुष संघाच्या ऐतिहासिक विजयानंतर, हरिका द्रोणवल्ली, वैशाली रमेशबाबू, दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल, तानिया सचदेव आणि अभिजित कुंटे या संघाने बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतासाठी ऐतिहासिक दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले. भारतीय महिला संघासाठी, डी हरिका (३३ वर्षे) ने अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी केली आणि पहिल्या बोर्डवर तांत्रिक श्रेष्ठता दाखवत गुणे मामदजादावर विजय मिळवला. १८ वर्षीय दिव्या देशमुखने पुन्हा एकदा प्रतिस्पर्ध्याला मागे टाकत तिसऱ्या बोर्डमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक मिळवले. तिने ११ पैकी ९.५ गुण मिळवून गोवर बेदुलायेवाचा पराभव केला. आर वैशाली (२३ वर्षे) हिने उलविया तालियेवाविरूद्ध ड्रॉ खेळल्यानंतर, वंतिका अग्रवाल (२१ वर्षे) हिने खानिम बालाझायेवावर नेत्रदीपक विजय मिळवून कठीण परिस्थितीतून पुनरागमन केले आणि भारतीय संघासाठी सुवर्णपदक निश्चित केले. महिला संघाने एकूण १९ गुण मिळवले जे त्यांना अंतिम फेरीत जिंकण्यासाठी आवश्यक होते.

## श्रीलंकेची गुणतालिकेत जोरदार मुसंडी;

### न्यूझीलंडचं अंतिम फेरीचं स्वप्न विरणार?



**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा संघ सध्या श्रीलंकेच्या दौऱ्यावर असून तिथे दोन्ही संघांमध्ये कसोटी मालिका खेळवली जात आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात श्रीलंकेने मोठा अपसेट निर्माण करत न्यूझीलंडचा ६३ धावांनी पराभव केला. या विजयासह यजमान श्रीलंकेने १-० अशी आघाडी घेतली आहे. श्रीलंकेचा विजय आणि न्यूझीलंडच्या पराभवानंतर आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलच्या गुणतालिकेचे समीकरणही बदलताना दिसत आहे.

पहिल्या कसोटी मालिकेच्या शेवटच्या दिवशी श्रीलंकेने न्यूझीलंडचा ६३ धावांनी पराभव केला. चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत न्यूझीलंडने ८ बाद २०७ धावा केल्या होत्या. विजयासाठी किवी संघाला ६८ धावांची गरज होती. रचिन रवींद्र ९१ आणि एजाज पटेल हा खाते न उघडता खेळत होता. पाचव्या दिवशी न्यूझीलंडचा संघ २९ चेंडूत दोन विकेट गमावत सर्वबाद झाला. प्रभात जयसूर्याने रचिन रवींद्र आणि विल्यम ओरुर्के यांना बाद करत पाच विकेट घेतल्या. प्रभात जयसूर्याला सामन्यात ९ विकेट्स घेतल्याबद्दल सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने पहिल्या डावात ४ तर दुसऱ्या डावात ५ विकेट घेतल्या. त्याने १५ सामन्यात ८८ विकेट्स घेतल्या आहेत. रचिन रवींद्र पाचव्या दिवशी अवघी १ धाव जोडून बाद झाला. त्याचे शतक तर हुकलेच पण न्यूझीलंडच्या विजयाच्या आशाही संपल्या.

२७ सप्टेंबरला श्रीलंका-न्यूझीलंड यांच्यात दुसरा कसोटी सामना खेळवला जाणार आहे. पहिल्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडला पराभूत केल्यानंतर, श्रीलंकेने जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीच्या गुणतालिकेत मोठी झेप घेतली आहे. श्रीलंकेने आता न्यूझीलंडला मागे टाकले आहे. ८ सामन्यात ४ विजय आणि ४ पराभवानंतर श्रीलंकेचे ४८ गुण झाले असून ऑस्ट्रेलियानंतर संघ आता तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. दुसरीकडे, न्यूझीलंडने गुणतालिकेत एक स्थान गमावले आहे. श्रीलंकेकडून झालेल्या पराभवानंतर न्यूझीलंडचा संघ आता चौथ्या स्थानावर घसरला आहे. किवी संघाचे ७ सामन्यात ३ विजय आणि ४ पराभवानंतर ३६ गुण आहेत. भारतीय संघ अजूनही पहिल्या स्थानावर आहे, तर ऑस्ट्रेलियन संघ दुसऱ्या स्थानावर कायम असल्याचे दिसून येत आहे.




● रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्यावतीने आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला आज (ता.२३) अलिबाग पोलीस परेड मैदानावर सुरुवात झाली. १४, १७ आणि १९ वर्ष या तीन वयो गटातील मुलांची ही स्पर्धा असून या स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक शालेय संघ सहभागी झाले आहेत. (छायाचित्र - समीर मालोदे)

## रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे

# १४ वर्षांखालील मुलांची जिल्हा संघ निवड चाचणी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य क्रिकेट असोसिएशनच्यावतीने राज्यस्तरीय १४ वर्षांखालील मुलांची अंतर जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा होणार आहे. त्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे १४ वर्षांखालील खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी गुरुवार व शुक्रवार दिनांक २६ व २७ सप्टेंबर रोजी बी.पी पाटील स्पोर्ट्स अकॅडमी इनामपुरी सेक्टर ३७ खारघर येथे घेण्यात येणार आहे. यासाठी निवड चाचणी करिता १ सप्टेंबर २०१०( ०१/०९/२०१० ) नंतर जन्मलेल्या खेळाडूंचा विचार करण्यात येईल.

निवड झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय आमंत्रितांच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. तरी सर्व खेळाडूंनी आपला नवीन फोटो, अपडेट आधार कार्ड झेरॉक्स प्रत, जन्म दाखला झेरॉक्स प्रत, मागील तिन वर्षाची शाळेची मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत तसेच सर्व खेळाडूंनी सफेद क्रिकेट पोशाखात, स्वतः च्या क्रिकेट साहित्यासह गुरुवार व शुक्रवार २६ व २७ सप्टेंबर रोजी बी.पी पाटील स्पोर्ट्स अकॅडमी इनामपुरी सेक्टर ३७ खारघर येथे सकाळी ०९.०० वाजता हजर रहावे.

दरम्यान, अधिक माहितीसाठी ९९८७१५४६५२ या क्रमांकावर संपर्क साधावे, असे आवाहन आरडीसीए अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदिप नाईक यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# टीम युरोपने लेव्हर कप जिंकला



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

स्पेनचा टेनिसपटू कार्लोस अल्कारेझच्या दमदार कामगिरीमुळे टीम युरोपने लेव्हर कप जिंकला आहे. युरोपने टीम वर्ल्डचा १३-११ ने पराभव केला. २१ वर्षीय अल्कारेजने रविवारी रात्री झालेल्या शेवटच्या सामन्यात टेलर फ्रिट्झचा ६-२, ७-५ असा पराभव केला. टीम युरोपने ५ व्यांदा लेव्हर कप जिंकला आहे. यापूर्वी टीम युरोप ३ वर्षांपूर्वी २०२१ मध्ये चॅम्पियन बनली होती. विजयानंतर अल्कारेझने कर्णधार ब्योर्न बोर्गला मिठी मारली आणि म्हणाला, आम्ही तुमच्यासाठी हे केले.

लेव्हर कप म्हणजे काय? लेव्हर कप ही एक प्रतिष्ठित टेनिस स्पर्धा आहे. जो टीम युरोप आणि टीम वर्ल्ड यांच्यात खेळली जाते. त्याची सुरुवात २०१७ मध्ये झाली. ही स्पर्धा ३ दिवस चालते. ३ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत दोन्ही संघांचे ६-६ सदस्य आहेत. एकामध्ये युरोपियन स्टार्सचा समावेश आहे. तर दुसऱ्यामध्ये जगभरातील अव्वल खेळाडूंचा समावेश आहे. स्पर्धेत ९ एकेरी आणि ३ दुहेरीचे सामने आहेत. दररोज एक दुहेरी आणि ३ एकेरी सामने होतात. पहिल्या दिवशी प्रत्येक सामना जिंकण्यासाठी एक गुण, दुसऱ्या दिवशी प्रत्येक सामना जिंकण्यासाठी दोन गुण आणि तिसऱ्या दिवशी सामना जिंकण्यासाठी तीन गुण दिले जातात. १३ गुणांपर्यंत पोहोचणारा पहिला संघ चॅम्पियन होतो. अल्कारेझ, झ्वेरेव्ह आणि दिमित्रोव्ह यांनी शेवटच्या दिवशी पुनरागमन केले. स्पर्धेच्या तिसऱ्या आणि शेवटच्या दिवशी टीम युरोप ४-८ ने पिछाडीवर होती. अशा स्थितीत अल्कारेझ आणि रुड जोडीने दिवसाच्या पहिल्या दुहेरी सामन्यात बेन शेल्टन आणि फ्रान्सिस टियाफो यांच्यावर ६-२, ७-६ असा विजय नोंदवला आणि अंतिम स्कोअर ७-८ असा केला. परंतु, दिमित्रोव्हला बेन शेल्टनविरुद्ध पराभव पत्करावा लागला.

७-६, ७-६ असा ५-७, ७-१० असा पराभव केला. येथे टीम वर्ल्ड ११-७ ने पुढे गेली. अशा स्थितीत झ्वेरेव्ह आणि अल्काराझ यांनी आपापल्या एकेरीचे सामने जिंकून ६ गुणांची कमाई केली आणि संघाला विजयाकडे नेले.

## ''रन बडीज'' या संस्थेचा उपक्रम

# पर्यटन वाढीसाठी लाल मातीतून धावले धावपट्टू



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानचे पर्यटन वाढावे आणि माथेरान पर्यटनस्थळाचे नाव सर्वदूर पोहचावे या उद्देशाने मुंबई व पुणे येथील''रन बडीज''या संस्थेच्या माध्यमातून निसर्गरम्य माथेरान पर्यटनस्थळी खुल्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

निसर्ग संवर्धनासाठी या ठिकाणी पर्यटक एकत्र धावले. माथेरानच्या आल्हाददायक थंडीत धुक्याची दुलई बाजूला सारत येथील लालमातीच्या रस्त्यावर इथल्या मोकळ्या निसर्गात धावण्यासाठी येथे देशभरातील धावपट्टूंनी ''रन बडीज'' या संस्थेच्या माथेरान मॅरेथॉन स्पर्धेत उस्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये मुंबई, पुणे, गुजरात, दिल्ली, पंजाब येथून धावपट्टूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. १० कि.मी, २५ कि.मी, ३५ कि.मी व ५० किलोमीटर अशा चार टप्प्यात स्पर्धा संपन्न झाली. याठिकाणी एकूण १८० स्पर्धकांनी भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वी केली. येथील एका हॉटेलमध्ये स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. येथे सध्या पावसाळी पर्यटनानंतर पर्यटकांची संख्या थोडी रोडावली आहे.त्यामुळे माथेरानच्या पर्यटन वाढीसाठी व निसर्गसंवर्धनासाठी अशा स्पर्धा येथे घेतल्या गेल्या पाहिजेत. स्पर्धेमुळे माथेरानमधील विविध व्यवसाय तसेच रोजगाराच्या संधी निर्माण झाल्याचे दिसून आले.

# जगाला मिळाला दुसरा शोएब अख्तर?

**। रावळपींडी । वृत्तसंस्था ।**


शोएब अख्तर हा क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात वेगवान गोलंदाज आहे. त्याने २००३ मध्ये ताशी १६१.३ किमी वेगाने चेंडू टाकला होता. जो क्रिकेटच्या इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात वेगवान चेंडू आहे. अख्तरच्या रेकॉर्डला २० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. पण त्याचा रेकॉर्ड कोणीही मोडू शकले नाही.

अख्तर याच्यानंतर त्यांच्यासारखा वेगवान गोलंदाज क्रिकेट जगतात आला आहे. ज्यामध्ये एक गोलंदाज हुबेहुब अख्तरप्रमाणे गोलंदाजी करत आहे. विशेष म्हणजे शोएब अख्तरने स्वतः या गोलंदाजाचा व्हिडिओ आपल्या इंस्टाग्राम स्टोरीद्वारे शेअर केला होता. अख्तरप्रमाणे गोलंदाजी करणाऱ्या खेळाडूचे नाव इमरान मोहम्मद असून तो ओमानमध्ये क्रिकेट खेळतो.

सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडिओमध्ये इमरान शोएब अख्तरप्रमाणेच रनअप घेताना दिसतो. याशिवाय त्याची ॲक्शनही शोएब अख्तरसारखीच आहे. हे फक्त धावणे आणि गोलंदाजीची ॲक्शन सारखे असण्यापुरते मर्यादित नाही, तर इम्रानचे दिसणे हे दखील अख्तरसारखेच आहे.

## जर्मनीतील आयर्नमॅन ७०.३ ट्रायथलॉन खडतर स्पर्धा केली पूर्ण

# सैयामीने केलं सर्वांनाच थक्क





**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

घूमर या हिंदी चित्रपटात हात गमावलेल्या क्रिकेटपटूची भूमिका करुन सर्वांचं लक्ष वेधून घेणाऱ्या सैयामी खेरनं अनेकांना जमणार नाही अशी कामगिरी केली आहे. सैयामीनं जर्मनीतील आयर्नमॅन ७०.३ ट्रायथलॉन ही खडतर स्पर्धा पूर्ण केली आहे. ही स्पर्धा पूर्ण करण्यासाठी ९० किलोमीटर सायकलिंग, २१.१ किलोमीटर रनिंग आणि १.९ किलोमीटर पोहणे हे टप्पे पूर्ण करावे लागतात. आयर्नमॅनची खडतर शर्यत पूर्ण करणारी सैयामी पहिली भारतीय अभिनेत्री आहे. सैयामीनं स्वत: इन्स्टाग्रामवर या कामगिरीचा फोटो शेअर केला आहे. आयर्नमॅन ही जगातील खडतर स्पर्धा मानली जाते. त्यामध्ये स्पर्धकाच्या शारीरिक तसंच मानसिक क्षमतेचा मोठा कस लागतो. ही स्पर्धा पूर्ण करण्याची सैयामीची खूप दिवसांपासून इच्छा होती. अखेर हे लक्ष्य पूर्ण केल्याबद्दल सैयामीनं आनंद व्यक्त केला आहे. ही शर्यत पूर्ण करणे माझ्यासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. मी खूप दिवसांपासून याचं नियोजन करत होते. हा माझ्या आयुष्यातील आत्तापर्यंतचा सर्वात अभिमानाचा क्षण आहे. या शर्यतीमध्ये पळण्यापेक्षा याची तयारी करणे अधिक कठीण होतं. यासाठी मला रोज १२-१४ तास सराव करावा लागला. या शर्यतीमध्ये माझी लढाई माझ्याशीच होती, अशी भावना सैयामीनं व्यक्त केली आहे. सैयामीनं २०१६ साली मिर्झा लेडीमधून कारकिर्दीला सुरुवात केली. घुमर या सिनेमातील तिच्या भूमिकेचं विशेष कौतुक झालं. या सिनेमात अभिषेक बच्चनची प्रमुख भूमिका होती. तसंच अमिताभ बच्चननं ही पाहुणा कलाकार म्हणून काम केलं होतं.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८४५३८.
■ **संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)